दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२२१ | रविवार दि.०१ नोव्हेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

संपादकीय....

सुरत डायमंड बोर्स: ३२०० कोटींची भव्य इमारत आणि हरवलेली बाजारपेठ!

देशात विकासाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचे महाप्रकल्प उभारले जातात, तेव्हा त्यामागे एक मोठे स्वप्न आणि आर्थिक समृद्धीचा उद्देश असतो. परंतु, प्रत्यक्ष अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींमुळे ते प्रकल्प कसे कुपोषित ठरतात, याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे गुजरातमधील सुरत डायमंड बोर्स ३,२०० कोटी रुपये खर्च करून जगातील सर्वांत मोठे कार्यालयीन संकुल म्हणून उभे राहिलेले हे केंद्र आज व्यापारी नसल्यामुळे 'पांढरा हत्ती' ठरत असल्याची चर्चा आहे.१७ डिसेंबर २०२३ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मोठ्या दिमाखात या प्रकल्पाचे उद्घाटन झाले. मुंबईतील हिऱ्यांचा व्यापार गुजरातमध्ये आणणे, सुरतला जागतिक हिरे व्यापाराचे आंतरराष्ट्रीय केंद्र बनवणे आणि हजारो रोजगार निर्माण करणे हा यामागील मुख्य उद्देश होता.

थोडक्यात...

श्रीलंकेत उभारणार डॉ.आंबेडकर यांचा पुतळा

मुंबई: भारत आणि श्रीलंका या दोन देशांमधील आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक संबंधांना नव्या उंचीवर नेणाऱ्या एका महत्त्वपूर्ण पर्वाचा नुकताच श्रीलंकेत प्रारंभ झाला आहे. श्रीलंकेतील बियागामा येथे मैत्री सेतू शैक्षणिक व सांस्कृतिक संकुलाचा भूमिपूजन सोहळा अत्यंत उत्साही आणि मंगलमय वातावरणात पार पडला आहे. या ऐतिहासिक प्रकल्पाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे या संकुलात श्रीलंकेच्या इतिहासात प्रथमच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पुतळा उभारण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या विशेष प्रयत्नातून शिवसेनेच्या पुढाकाराने हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकारला जात आहे. या दिमाखदार भूमिपूजन सोहळ्यासाठी शिवसेनेच्या राज्यसभा खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच कल्याणमधील शिवसेनेचे पदाधिकारी सुमेध हुमणे यांच्यासह भारत आणि श्रीलंकेचे उच्चायुक्त व दोन्ही देशांतील इतर अनेक मान्यवर मंडळी या सोहळ्यास आवर्जून उपस्थित होती.

१२ वर्षांत ५० कोटी नागरिक दारिद्र्यरेषेबाहेर

नवी दिल्ली: जागतिक बँकेच्या ऑक्टोबर २०२६ च्या 'पॉव्हर्टी अँड इक्विटी ब्रीफ' अहवालानुसार, २०११ ते २०२३ या कालावधीत भारताने तब्बल ४९.६ कोटी (सुमारे ४९६ दशलक्ष) नागरिकांना गरिबीच्या गर्तेतून बाहेर काढले आहे. या ऐतिहासिक कामगिरीमुळे देशातील तीव्र दारिद्र्याचे प्रमाण २७.१ टक्क्यांवरून थेट २.६ टक्क्यांवर आले आहे. जागतिक बँकेने भारताच्या या प्रगतीचे कौतुक करताना ही जगभरातील सर्वात वेगवान दारिद्र्य घट असल्याचे नमूद केले आहे. जागतिक बँकेच्या निकषानुसार निम्न मध्यम उत्पन्न गटासाठी दैनंदिन ४.२० अमेरिकन डॉलर (२०२१ च्या क्रयशक्ती क्षमतेनुसार) ही मर्यादा मानली जाते. या मर्यादेखाली जगणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण २०११ मधील ५७.७ टक्क्यांवरून २०२३ मध्ये १६.१ टक्क्यांपर्यंत घसरले आहे. वित्तीय निर्देशांकांसोबतच गैरवित्तीय निर्देशांकांमध्येही भरीव सुधारणा दिसून आली आहे.

प्रसिद्ध निर्माते– दिग्दर्शक संजय गुप्ता यांचे निधन

मुंबई: चित्रपट निर्माते संजय गुप्ता यांच्या निधनाप्रकरणी वर्सोवा पोलिसांनी 'अपघाती मृत्यूची नोंद' केली आहे. ३० ऑक्टोबरच्या रात्री मुंबईतील त्यांच्या निवासस्थानी पडल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. ते ५७ वर्षांचे होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वर्सोवा येथील त्यांच्या घरी स्वयंपाकघरातील फरशीवर पाय घसरून ते पडले असावेत, असा संशय आहे. कुटुंबीयांना उशिरा ही गोष्ट समजली; त्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, परंतु डोक्याला झालेल्या दुखापतीमुळे त्यांचा मृत्यू झाला. संजय गुप्ता हे प्रामुख्याने त्यांच्या शैलीदार क्राईम ड्रामा, गँगस्टरपट आणि क्शन थ्रिलर चित्रपटांसाठी ओळखले जात होते. त्यांच्या गाजलेल्या चित्रपटांमध्ये 'कांटे', 'आतिश', 'शूटआउट ट लोखंडवाला', 'शूटआउट ट वडाला' आणि 'काबिल' यांचा समावेश आहे. त्यांनी १९९४ साली प्रदर्शित झालेल्या 'आतिश: फील द फायर' या चित्रपटाद्वारे दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण केले.

मराठवाड्यात रब्बीचाही हंगाम संकटात!

छ.संभाजीनगर, जालना, बीडमध्ये २० टक्के पेरणीही कठीण; कृषी विभागाचा अंदाज, दुष्काळी स्थितीचा फटका

छ.संभाजीनगर। प्रतिनिधी

यंदाच्या दुष्काळी परिस्थितीचा फटका आता रब्बी हंगामालाही बसण्याची चिन्हे आहेत. छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड या मराठवाड्यातील तीन जिल्ह्यांत रब्बी पेरणीचे नियोजन कोलमडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जमिनीत पुरेशी ओल नसणे, सिंचनासाठी पाण्याचे स्रोत आटणे आणि पावसातील मोठे खंड यामुळे कृषी विभागाने नियोजित केलेले क्षेत्रही पेरणीखाली येणे अवघड झाले आहे. आतापर्यंतची पेरणी पाहता आता पाऊस झाला तरी २० टक्क्यांपेक्षा अधिक क्षेत्रावर रब्बीची पेरणी होण्याची शक्यता नसल्याचा अंदाज विभागीय संशोधन सल्लागार समितीच्या बैठकीत कृषी विभागाने व्यक्त केला आहे.



कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार, छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड या तीन जिल्ह्यांचे रब्बीचे सरासरी क्षेत्र ७ लाख २८ हजार हेक्टर आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात २ लाख ३९ हजार, जालना जिल्ह्यात २ लाख १२ हजार, तर बीड जिल्ह्यात २ लाख ७७ हजार हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे. मात्र, मागील पाच वर्षांत या तीन जिल्ह्यांत सरासरी ९ लाख ४९ हजार हेक्टरवर रब्बीची पेरणी झाली होती. २०२५–२६ मध्ये तर हे क्षेत्र १० लाख ९४ हजार हेक्टरपर्यंत पोहोचले होते. यंदा मात्र परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. एल निनोचे संकट आणि पावसाने दिलेली ओढ यामुळे कृषी विभागाने यंदा रब्बीचे नियोजन केवळ २ लाख ७० हजार हेक्टरवर मर्यादित ठेवले आहे. त्यात छत्रपती संभाजीनगरसाठी ८३ हजार, जालन्यासाठी ९१ हजार आणि बीड जिल्ह्यासाठी ९६ हजार हेक्टरचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. गतवर्षीच्या तुलनेत हे नियोजन अत्यंत कमी असून, प्रत्यक्ष पेरणीची स्थिती पाहता हे उद्दिष्ट गाठण्याबाबतही साशंकता आहे. यंदाच्या रब्बी हंगामात ज्वारीला सर्वाधिक १ लाख ▶▶ पान २ वर

७० टक्के पाऊस; तरीही खरीप संकटात

यंदाच्या पावसाळ्यात तिन्ही जिल्ह्यांत सरासरी ५८३.६३ मिलिमीटर पावसाच्या तुलनेत प्रत्यक्षात ४१२.५७ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. म्हणजेच सरासरीच्या सुमारे ७० टक्के पाऊस झाला आहे. मात्र, पावसाची एकूण आकडेवारी आणि प्रत्यक्ष शेतीला झालेला फायदा यामध्ये मोठी तफावत आहे. २.५ मिलिमीटर किंवा त्यापेक्षा अधिक पाऊस झाल्यासच पावसाचा दिवस म्हणून त्याची नोंद केली जाते. अनेक ठिकाणी अल्प ते अत्यल्प पाऊस झाला, तर पावसाच्या मोठ्या खंडांमुळे जमिनीत पुरेसा ओलावा टिकू शकला नाही.

लातूरमध्ये कुरिअरच्या पार्सलमध्ये भीषण स्फोट; कर्मचारी गंभीर भाजला

लातूर । प्रतिनिधी

शनिवारी (३१ ऑक्टोबर) सकाळी सकाळी एका खासगी कुरिअर कंपनीच्या वाहनातून पार्सल उतरवत असताना अचानक भीषण स्फोट झाला. यात कुरिअर कंपनीचा एका कर्मचारी गंभीर जखमी झाला आहे. दरम्यान, पार्सलमध्ये बंदूक सापडल्याने पोलीस कसून तपास करीत आहेत.

शहरातील मुख्य छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडून विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाकडे (जीएमसी) जाणाऱ्या समांतर रस्त्याच्या डाव्या बाजूस अनेक खासगी कुरिअर कंपन्यांची कार्यालये आणि दुकाने आहेत. माहितीनुसार, इतर शहरांतून पार्सल घेऊन कुरिअर कंपनीचे मालवाहू वाहन दुकानासमोर आले. त्यानंतर वाहनातून पार्सल काढण्याचे काम



सुरू झाले. मात्र त्याचवेळी एका पार्सलचा भीषण स्फोट झाला. हा स्फोट इतका तीव्र होता की टेम्पोचे छत आणि काचा फुटून वाहनाचे प्रचंड नुकसान झाले. यावेळी पार्सल हाताळत असलेला कर्मचारी थेट आगीच्या आणि धुराच्या लोटात सापडल्याने गंभीररीत्या भाजला. अशावेळी प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी जखमी कर्मचाऱ्याला उपचारासाठी तात्काळ जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल केले. या स्फोटाची माहिती मिळताच लातूर पोलीस, श्वान पथक आणि फॉरेन्सिक टीमने तात्काळ ▶▶ पान २ वर

लेक लाडकी योजनेचा लाभ आता घरबसल्या; अंगणवाडीचे खेटे वाचणार!

महाडीबीटी २.० पोर्टलवरून ऑनलाइन अर्जाची सुविधा

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील मुलींच्या शिक्षणाला आणि आर्थिक सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या महत्त्वाकांक्षी 'लेक लाडकी योजने'च्या अंमलबजावणीत राज्य सरकारने महत्त्वपूर्ण बदल केला आहे. या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी पालकांना आता अंगणवाडी केंद्रांचे वारंवार खेटे घालण्याची आवश्यकता राहणार नाही. महिला व बालविकास



विभागाने अर्ज प्रक्रियेचे सुलभीकरण करत महाडीबीटी २.० पोर्टलच्या माध्यमातून थेट ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे लाभार्थी कुटुंबांना घरबसल्या मोबाईल किंवा संगणकावरून अर्ज करता येणार असून, कागदपत्रांची जुळवाजुळव आणि प्रशासकीय प्रक्रियेसाठी होणारी धावपळ कमी होणार आहे.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी या बदलाची माहिती दिली. यापूर्वी लेक लाडकी योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांच्या पालकांना संबंधित अंगणवाडी केंद्रात प्रत्यक्ष जाऊन आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावा लागत होता. त्यानंतर हे अर्ज अंगणवाडी ▶▶ पान २ वर

आजच्या महारॅलीसाठी महाराष्ट्रातून काँग्रेसचे ५ हजार कार्यकर्ते जाणार

मुंबई । प्रतिनिधी

दिल्लीच्या रामलीला मैदानावर १ नोव्हेंबर २०२६ रोजी इंडिया आघाडीची महारॅली होत आहे. या महारॅलीत सहभागी होण्यासाठी राज्यातील, प्रमुख नेते खासदार, आमदार, माजी मंत्री, माजी आमदार, माजी खासदार, प्रदेश काँग्रेसचे पदाधिकारी, काँग्रेसचे विविध सेल व विभागाचे पदाधिकारी सहभागी होणार आहेत. दिल्लीतील महारॅलीसाठी महाराष्ट्रातून काँग्रेसचे पाच हजारांहून अधिक नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होत आहेत.

लोकशाही व संविधानाच्या रक्षणासाठी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या पुढाकाराने इंडिया आघाडीने रणशिंग फुंकले आहे. हा लढा संसदेत व संसदेबाहेर ▶▶ पान २ वर

राष्ट्रपतींच्या हस्ते सिंहस्थ कुंभपर्वाचा शुभारंभ!

रामकुंडावर गंगापूजन,धर्मध्वज फडकवला

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक–त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभपर्व २०२६–२८ चा अधिकृत शुभारंभ शनिवारी (दि. ३१ ऑक्टोबर) भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. गोदावरी नदीच्या पवित्र रामकुंडावर राष्ट्रपतींनी विधिवत गंगापूजन केले. तसेच वैदिक मंत्रोच्चारात धर्मध्वज फडकवून सिंहस्थ कुंभपर्वाचा धार्मिक सोहळ्याचा प्रारंभ केला. या ऐतिहासिक सोहळ्याला राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्यासह



राज्य मंत्रिमंडळातील सदस्य, साधू–संत आणि हजारो भाविक उपस्थित होते.

यावेळी बोलताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नाशिकच्या भूमीत येऊन प्रसन्न वाटत असल्याची भावना व्यक्त केली. ▶▶ पान २ वर

कुंभमेळ्यात विकासकामांच्या नावाखाली कोट्यवधींचा भ्रष्टाचार-आ.रोहित पवार

पुणे । प्रतिनिधी

नाशिकमध्ये ऐतिहासिक सिंहस्थ कुंभमेळा पर्वाला सुरुवात झाली आहे. मात्र याआधी सिंहस्थ कुंभमेळ्यात विकासकामांच्या निमित्ताने मोठा भ्रष्टाचार होत असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पुन्हा एकदा केला आहे.

कुंभमेळ्याच्या खर्चात ३५ हजार कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचा



आरोप त्यांनी केला आहे. याबाबत रोहित पवार यांनी वृत्तपत्रामध्ये नोटीस प्रसिद्ध करून महायुती सरकारविरोधात थेट कायदेशीर लढाईचे रणशिंग फुंकले आहे. रोहित पवार यांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ▶▶ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.३० ऑक्टोबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू: ३९.५० क्विंटल

किमान	कमाल	सरासरी
२,९००	४,२०१	३,२१०

ज्वारी/हायब्रिड : ८३.५० क्विंटल

३,४९०	७,८५६	५,७३६

मका/लोकल: १.०० क्विंटल

२,३००	२,३००	२,३००

तूर : ५.००क्विंटल

७,४००	९,८००	८,७३३

उडीद : ५.०० क्विंटल

८,९९९	९,२००	९,०९९

बाजरी: १४.५० क्विंटल

३,५००	३,९००	३,७१७

मुग: २.०० क्विंटल

९,२००	९,३०१	९,२५०

सोयाबीन: १४२.०० क्विंटल

६,७००	६,९२५	६,८४२

हरभरा: ४.५० क्विंटल

५,८००	७,१५०	६,५१३

मतचोरी रोखण्यासाठी विरोधकांचा 'जन महाभियोग'

ज्ञानेश कुमारांविरोधात खर्गेंचा एल्गार



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात इंडिया आघाडीने शनिवारी (दि. ३१) काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या दिल्लीतील निवासस्थानी प्रतीकात्मक 'जन महाभियोगा'चे आयोजन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद माजी लोकसभा अध्यक्ष मीरा कुमार यांनी भूषवले. मतदार यादीतील कथित फेरफार आणि मतांची चोरी या मुद्द्यांवरून विरोधकांनी निवडणूक आयोगाला लक्ष्य करत केंद्र सरकारविरोधात जोरदार भूमिका मांडली.

या कार्यक्रमात बोलताना मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर गंभीर आरोप केले. २०१४ पासून सत्ता मिळवण्यासाठी आणि ती टिकवून ठेवण्यासाठी विविध राजकीय डावपेच आखले जात असल्याचा दावा त्यांनी केला. खासदार फोडणे, राजकीय पक्षांमध्ये फूट पाडणे, सरकारे पाडणे, निवडणूक रोख्यांचा वापर तसेच ईडी आणि सीबीआय ▶▶ पान २ वर

लोकतंत्र आहेच!

नेत्यांचा नव्हे पदवीधरांचा 'प्रताप'!



बीड । सुभाष चौरे

हा विजय कोणत्याही बड्या नेत्यांचा किंवा पक्षाच्या रणनीतीचा नसून, बदलाची आस धरणाऱ्या सजग मतदारांचा आहे, असा रोखठोक संदेश मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निकालाने दिला आहे. गेली १८ वर्षे या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे विद्यमान आमदार सतीश चव्हाण यांचा अनपेक्षित पराभव करत महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.प्रताप पाटील यांनी ऐतिहासिक विजय नोंदवला. म्हणजे लोकतंत्र जिवंत आहे याचे हे उत्तम उदाहरण म्हणावे लागेल.

गृहीत धरू नका, अंतिम सत्ता मतदारांच्याच हातात...

नुकत्याच पार पडलेल्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकांनी प्रस्थापित राजकीय समीकरणांना जोरदार सुरुंग लावला आहे. मतदारांना गृहीत धरणारे नेते कितीही ताकदवान असले, तरी शेवटी अंतिम सत्ता ही मतदारांच्याच हातात असते, हे या निकालाने पुन्हा एकदा सिद्ध केले.

मराठवाडा पदवीधर मतदार संघामध्ये पूर्वीपासूनच विद्यमान आमदारावर पदवीधरांचा रोष होता त्यातच महायुतीबद्दल फारशी सहानुभूती दिसली नाही प्रस्थापित सत्तेविरुद्धचा तीव्र रोष आणि लोकशाहीची ताकद अधोरेखित करणारा हा निकाल सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे. गेल्या तीन टर्मपासून सलग १८ वर्षे सतीश चव्हाण या मतदारसंघावर पकड ठेवून होते. मात्र, दीर्घकाळ सत्तेत राहिल्यामुळे निर्माण झालेली 'अँटी–इन्कम्बन्सी' (प्रस्थापितविरोधी लाट) आणि पदवीधरांच्या दीर्घकाळ प्रलंबित राहिलेल्या प्रश्नांकडे झालेले दुर्लक्ष



मोजक्याच लोकांच्या हाती प्रचाराची धुरा मराठवाड्यात होऊ नये असणाऱ्या नेत्यांना जाणीवपूर्वक डावलने हे चव्हाण यांच्या पराभवास कारणीभूत ठरले. महायुतीकडून चव्हाण यांच्या विजयासाठी वरवर प्रयत्न झाले असले, तरी ▶▶ पान २ वर

अग्रलेख

घोषणांच्या झगमगाटात हरवलेला सामान्य माणूस

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानंतर देश आता थेट २०४७ मधील 'विकसित भारता'चे स्वप्न पाहत आहे. मागील काही वर्षांत देशाने अनेक ऐतिहासिक आणि मोठे टप्पे पार केले आहेत. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी झालेली नोटाबंदी, १ जुलै २०१७ रोजी लागू झालेला जीएसटी, जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० हटवण्याचा निर्णय आणि अयोध्येत दिमाखात उभे राहिलेले ऐतिहासिक राम मंदिरहे सर्व टप्पे देशाच्या राजकारणात आणि व्यवस्थेत मोठे बदल घडवून आणणारे ठरले. मात्र, या प्रत्येक मोठ्या निर्णयाच्या केंद्रस्थानी असलेला 'सामान्य माणूस' आज कुठे उभा आहे? हा प्रश्न आता अनुत्तरित राहून चालणार नाही. एका बाजूला भव्य घोषणांचा पाऊस आणि दुसऱ्या बाजूला प्रत्यक्षातील वास्तव, या दोन्हींचा ताळेबंद मांडण्याची वेळ आली आहे.

नोटाबंदीचा निर्णय घेताना काळा पैसा संपवणे, बनावट नोटांना आळा घालणे आणि भ्रष्टाचार रोखणे ही उद्दिष्टे समोर ठेवली गेली. परंतु, प्रत्यक्षात रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार, बाद झालेल्या एकूण चलनी नोटांपैकी तब्बल ९९.३ टक्के नोटा बँकिंग प्रणालीत परत आल्या. यामुळे काळा पाश पूर्णपणे नष्ट झाला का, हा संशोधनाचा विषय ठरला; पण या प्रक्रियेत रांगेत उभे राहिलेले सामान्य नागरिक, लहान व्यावसायिक आणि असंघटित क्षेत्रातील कामगार यांना मात्र आर्थिक संकटाचा सामना करावा लागला. त्यानंतर लागू झालेल्या 'एक देश, एक कर' म्हणजेच जीएसटी प्रणालीने महसूल वाढवण्यात यश मिळवले, यात शंका नाही. परंतु, छोट्या आणि मध्यम व्यावसायिकांना किचकट कायदे, डिजिटल विवरणपत्रे आणि करप्रक्रियेच्या कसरतीत अक्षरशः कंबरडा विकावा लागला. कागदावर कायदे सुटसुटीत वाटत असले, तरी छोट्या उद्योजकांच्या हातातील नफा आणि रोजगाराची संधी यावर याचा कसा परिणाम झाला, याचा प्रामाणिक लेखाजोखा मांडणे गरजेचे आहे जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० हटवणे आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अयोध्येत राम मंदिराची प्राणप्रतिष्ठा होणे, हे देशाच्या सांस्कृतिक आणि राजकीय पटलावर ऐतिहासिक क्षण होते. कोट्यवधी लोकांच्या श्रद्धेचा हा विषय होता आणि त्याचा आनंद साजरा करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. परंतु, विकासाची कोणतीही व्याख्या केवळ भावनिक मुद्द्यांवर किंवा धार्मिक प्रतीकांवर पूर्ण होऊ शकत नाही. राम मंदिर उभारणीचा आनंदोत्सव साजरा करत असतानाच, देशातील युवकांच्या हाताला मिळणारा रोजगार, शेतमालाला मिळणारा हमीभाव, महागाईमुळे कोलमडलेले घरगुती बजेट आणि शिक्षण-आरोग्याचा वाढता खर्च या मुळाशी असलेल्या समस्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. जेव्हा धार्मिक अस्मितेला अग्रक्रम दिला जातो, तेव्हा रोजच्या जगण्याच्या संघर्षाशी दोन हात करणाऱ्या शेतकऱ्याचे आणि कामगाराचे प्रश्न मागे पडतात सरकार २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून वाटचाल करत आहे. मोठे रस्ते, डिजिटल पायाभूत सुविधा, हायस्पीड रेल्वे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील वाढती प्रतिष्ठा याविषयी दुमत असण्याचे कारण नाही. पण विकसित प्रत्येक तरुणाला रोजगार: केवळ आकड्यांचा खेळ नको, तर खऱ्या अर्थाने हाताला काम मिळणे. आर्थिक स्थैर्य: महागाईच्या चक्रव्यूहात अडकलेल्या मध्यमवर्गीयांना आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळणे. दर्जेदार आणि परवडणारे शिक्षण-आरोग्य: जे सामान्यांच्या आवाक्यात असेल.सामाजिक सलोखा: देशात वाढत चाललेले धार्मिक ध्रुवीकरण थांबवून सर्वसमावेशक विकास साधणे.लोकशाहीत विरोध किंवा प्रश्न विचारणे म्हणजे देशद्रोह नव्हे, तर तो नागरिकाचा मूलभूत हिक आहे. जर प्रसारमाध्यमांनी सत्तेची आरती ओवाळण्याऐवजी तिचे परीक्षण करण्याचे आपले मूळ कर्तव्य सोडले, तर लोकशाहीचा पहारेकरी कोण उरणार? उद्योग क्षेत्रातील ठराविक कंपन्यांना मिळणारी विशेष सवलत असो वा सरकारी धोरणांचे परिणाम असोत, प्रत्येक गोष्टीचा हिशेब मागण्याचा अधिकार मतदारांना आहे''मोदी है तो मुमकिन है'' या घोषणांच्या प्रभावात वाहून न जाता, आज गरज आहे ती आत्मपरीक्षण करण्याची. कोणतीही व्यक्ती किंवा सत्ता ही प्रश्नांच्या पलीकडची नसते. निवडणुका आल्यावर घोषणांवर भाळण्याऐवजी मागील काही वर्षांत आपल्या जीवनात नेमका काय बदल झाला, हे तपासले पाहिजे.२०४७ चा विकसित भारत जर खऱ्या अर्थाने घडवायचा असेल, तर तो केवळ भव्य इमारतींचा आणि कागदावरील आकडेवारीचा भारत नसावा; तर तो प्रत्येक नागरिकाच्या चेहऱ्यावर समाधान आणणारा, सुरक्षित आणि लोकशाही मूल्यांची जोपासना करणारा असावा. यासाठी आता गप्प बसून चालणार नाहीविकासाचा हिशेब मागण्याची आणि सत्तेला जाब विचारण्याची हीच ती वेळ आहे!

दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी, महिला बचत गट व अल्प कर्जदारांकडून कर्जवसुली करू नये-जिल्हाधिकारी अशिमा मित्तल

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात सुरू असलेल्या दुष्काळसदृश परिस्थिती तसेच नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर शेती व शेतीपूरक व्यवसायांशी संबंधित कर्जदार, महिला बचत गट आणि अल्प कर्जदारांकडून सक्तीची कर्जवसुली करू नये, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालय येथे आज त्यांच्या अध्यक्षतेखाली सूक्ष्म वित्त संस्था यांच्या प्रतिनिधींची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस अतिरिक्त जिल्हाधिकारी रमेश मिसाळ आणि निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी मार्गदर्शन केले. तसेच सूक्ष्म वित्तीय संस्थांचे नेटवर्क पश्चिम विभागाचे प्रादेशिक प्रमुख देवेंद्र शहापूरकर यांच्या उपस्थितीत सूक्ष्म वित्तीय संस्थांचे नेटवर्कशी संबंधित १७ सूक्ष्म वित्त संस्था, स्मॉल फायनान्स बँका () तसेच काही खासगी क्षेत्रातील बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीमध्ये जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, महिला बचत गट आणि शेती व शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून असलेल्या लहान कर्जदारांच्या आर्थिक अडचणींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सद्यस्थितीत कर्जदारांकडून सक्तीने वसुली केल्यास त्यांच्या आर्थिक अडचणींमध्ये अधिक भर पडू शकते, त्यामुळे परिस्थिती पूर्ववत होईपर्यंत कोणत्याही प्रकारची जबरदस्तीची कर्जवसुली करू नये, असे जिल्हाधिकारी यांनी निर्देश दिले. राज्य शासनाच्या दिनांक २५.०९.२०२६ व ३०.०९.२०२६ रोजीच्या



मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने पात्र कर्जदारांना आवश्यक त्या सवलती व दिलासा देण्याचे निर्देश देत, शेती उत्पन्नावर किंवा शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून असलेल्या कर्जदारांच्या कर्जाचे पुनर्गठन पुनर्निर्धारण तसेच परतफेडीच्या अटींमध्ये आवश्यक ते बदल करून त्यांना आर्थिक दिलासा द्यावा, असेही सूचित करण्यात आले. यावेळी पुनर्गठित कर्जखात्यांना च्या मार्गदर्शक सूचनांनुसार परतफेडीसाठी कमाल मुदत उपलब्ध करून देणे सुलभ व्हावे, यासाठी पीक नुकसानीचे मूल्यांकन ३३ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक निश्चित करण्याबाबत जिल्हा प्रशासनाकडे विनंती करण्यात आली. सूक्ष्म वित्त संस्थांनी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नैसर्गिक आपत्तीग्रस्त कर्जदारांसाठी लागू असलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे. महिला कर्जदार, महिला बचत गट आणि अल्प उत्पन्न गटातील कर्जदारांना वसुलीसाठी कोणत्याही प्रकारचा मानसिक किंवा शारीरिक त्रास देऊ नये. कर्जवसुली करताना कोणत्याही प्रकारची दडपशाही, धमकी किंवा अनुचित पद्धतीचा अवलंब करू नये, अशा सूचना दिल्या. तसेच या कठीण परिस्थितीत सूक्ष्म वित्त संस्थांनी आपल्या कॉर्पोरेट सामाजिक दायित्व उपक्रमांतर्गत शेतकरी व गरजू कर्जदारांना मदत करावी. उपजीविकेचे साधन निर्माण करणाऱ्या व्यवसायांसाठी, कौशल्य विकास उपक्रमांसाठी तसेच उत्पन्नवाढीस पूरक उपक्रमांसाठी आवश्यक कर्जपुरवठा करून ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहारांना चालना द्यावी, असे आवाहन करण्यात आले. बैठकीत सूक्ष्म वित्त संस्थांच्या प्रतिनिधींनी काही गावांमध्ये काही असामाजिक घटकांकडून संस्थांच्या कर्मचाऱ्यांना गावात प्रवेश करण्यास विरोध केला जात असल्याचे निदर्शनास आणून दिले. संस्थांचे कर्मचारी केवळ कर्जवसुलीसाठी गावांमध्ये जात नसून नवीन कर्जवितरण, आरोग्य विमा तसेच इतर बँकिंग व वित्तीय सेवा पुरविण्यासाठीही भेटी देत असतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामकाजासाठी गावांमध्ये सुरक्षितपणे भेट देता यावी, यासाठी प्रशासनाने आवश्यक सहकार्य करावे, अशी मागणी त्यांनी केली. यावर प्रशासनाने स्पष्ट केले की, सूक्ष्म वित्त संस्थांनी सर्वप्रथम कर्जदारांच्या हिताचे संरक्षण करणे आणि च्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर संस्थांच्या कर्मचाऱ्यांनीही कर्जदारांशी सन्मानपूर्वक वागावे आणि नियमानुसारच कामकाज करावे. कर्जवसुलीच्या प्रक्रियेत संस्थांचे कर्मचारी मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करीत असल्यास संबंधित कर्जदारांना तक्रार नोंदविता यावी, यासाठी प्रत्येक सूक्ष्म वित्त संस्थेने स्वतंत्र हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करून द्यावा. या क्रमांकाची माहिती कर्जदारांपर्यंत पोहोचवावी आणि प्राप्त तक्रारींचे तातडीने निराकरण करावे, असे निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले. बैठकीत सूक्ष्म वित्तीय संस्थांचे नेटवर्कच्या माध्यमातून जालना जिल्ह्यात सुमारे २ लाख कर्जखाती असून १.१६ लाख लाभार्थी या वित्तीय सेवांचा लाभ घेत असल्याची माहिती देण्यात आली. त्यामुळे या मोठ्या लाभार्थी वर्गाला दुष्काळी परिस्थितीत दिलासा देण्यासाठी सर्व वित्तीय संस्थांनी संवेदनशीलतेने व समन्वयाने काम करण्याची आवश्यकता असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. बैठकीच्या शेवटी सूक्ष्म वित्त संस्थांच्या प्रतिनिधींनी दुष्काळी परिस्थितीत लहान कर्जदार, महिला कर्जदार व महिला बचत गटांना आवश्यक सहकार्य करण्याची तसेच प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याची ग्वाही दिली. दुष्काळाच्या कठीण काळात ग्रामीण भागातील शेतकरी, महिला व अल्प उत्पन्न गटातील कर्जदारांचे आर्थिक हित जपणे ही सर्व वित्तीय संस्थांची सामूहिक जबाबदारी असून, मानवी दृष्टिकोनातून कर्जदारांना दिलासा देण्यासाठी सर्व संस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी यावेळी केले.

पुणे राष्ट्रीय एकता दौडचा फ्लॅग ऑफ अमित शाह यांच्या हस्ते; ४० हजारांहून अधिक पुणेकर सहभागी होणार

पुणे । प्रतिनिधी

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते १५ नोव्हेंबर रोजी 'पुणे रन फॉर युनिटी २०२६' अर्थात पुणे राष्ट्रीय एकता दौडचा फ्लॅग ऑफ करण्यात येणार आहे. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकारातून आयोजित या मॅरेथॉनमध्ये ४० हजारांहून अधिक नागरिक सहभागी होणार असून, केनियांसह आफ्रिकन देशांतील आंतरराष्ट्रीय धावपटूही सहभागी होणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही यावेळी उपस्थिती राहणार आहे.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यासाठी या दौडचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा या उपक्रमातून 'नशामुक्त युवा, सशक्त युवा आणि विकसित भारत' हा संदेश दिला जाणार आहे. युवकांनी व्यसनांपासून दूर राहून व्यायाम आणि निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करावा, हा यामागील उद्देश आहे. या मॅरेथॉनमध्ये २१ किलोमीटर हाफ मॅरेथॉन, १० मैल स्पर्धात्मक धाव, १० किलोमीटर स्पर्धात्मक धाव, ५ किलोमीटर फन रन आणि ३ किलोमीटर फॅमिली व बिगिनर रन अशा पाच गटांत स्पर्धा होणार आहेत. व्यावसायिक धावपटूंसह विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि कुटुंबीयांनाही सहभागी होता येणार आहे. विजेत्यांना १० लाख रुपयांहून अधिक रोख पारितोषिके दिली जाणार आहेत. गेल्या वर्षीच्या स्पर्धेत २५ हजारांहून अधिक नागरिक सहभागी झाले होते. यंदा हा आकडा ४० हजारांवर नेण्याचे उद्दिष्ट आहे. शैक्षणिक संस्था, क्रीडा संघटना, सामाजिक संस्था आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचाही सहभाग अपेक्षित आहे. आंतरराष्ट्रीय धावपटूंच्या सहभागामुळे स्पर्धेला आंतरराष्ट्रीय स्वरूप मिळणार आहे. राष्ट्रीय एकात्मता, निरोगी जीवनशैली आणि व्यसनमुक्तीचा संदेश लोकसहभागातून व्यापक करण्याचा प्रयत्न आहे. गेल्या वर्षी २५ हजार पुणेकर सहभागी झाले होते. यंदा ४० हजारांहून अधिक नागरिक सहभागी होतील, असा विश्वास केंद्रीय राज्यमंत्री आणि मुख्य संयोजक मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केला आहे.

उत्कृष्ट उल्लेखनीय सेवा केल्यामुळे डीवायएसपी रामेश्वर रेंगे यांना केंद्रीय गृहमंत्री पदक

परतूर । प्रतिनिधी

उत्कृष्ट आणि उल्लेखनीय सेवेबद्दल दिला जाणारा अत्यंत प्रतिष्ठेचा केंद्रीय गृहमंत्री पदक डीवायएसपी श्री रामेश्वर रेंगे यांना जाहीर झाला आहे. त्यांच्या या दैदिप्यमान यशामुळे संपूर्ण जालना जिल्ह्यासह विशेषतः परतूर तालुक्याची मान अभिमानाने उंचावली आहे. या बहुमानाबद्दल श्री रेंगे सरांवर सर्व स्तरांतून कौतुकाचा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे पोलीस दलातील आपल्या आतापर्यंतच्या कारकिर्दीत अत्यंत



कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि धाडसी अधिकारी म्हणून ओळख निर्माण केली आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासोबतच अनेक गुंतागुंतीच्या गुन्ह्यांचा छडा लावण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या याच उत्कृष्ट सेवा, तपासकौशल्य आणि पोलीस दलातील अमूल्य योगदानाची दखल घेऊन त्यांना या सर्वोच्च पदकाने सन्मानित करण्यात आले आहे. श्री रेंगे हे परतूर तालुक्याचा अधिमानअसल्याने, त्यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील जनतेमध्ये आनंदाचे वातावरण आहे. एका सामान्य पार्श्वभूमीतून येत, आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी घेतलेली ही झेप ग्रामीण भागातील तरुणांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरत आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल परतूर तालुक्यातील विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांनी, तसेच ग्रामस्थांनी त्यांचे जाहीर अभिनंदन केले आहे. ''रामेश्वर रेंगे येणे आपल्या कर्तृत्वाने तालुक्याचा नावलौकिक देशपातळीवर पोहोचवला आहे,'' अशा भावना याप्रसंगी विविध क्षेत्रातील नागरिकांमधून व्यक्त होत आहेत.

पान १ वरून...

मराठवाड्यात रब्बीचाही

२० हजार हेक्टर क्षेत्राचे नियोजन आहे. त्यापाठोपाठ हरभरा ९० हजार, मका ३० हजार, गहू २० हजार, इतर तृणधान्ये ६ हजार, इतर कडधान्ये ३ हजार आणि गळीतधान्ये केवळ १ हजार हेक्टरवर घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र, पेरणीसाठी आवश्यक जमिनीतील ओलावा आणि पिकांच्या वाढीसाठी लागणारे पाणी उपलब्ध नसल्याने या नियोजनावरही पाणी फिरण्याची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यांत सरासरीच्या ७४ टक्के, तर बीड जिल्ह्यात अवघ्या ६३ टक्के पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे खरीप हंगामातच पिकांचे मोठे नुकसान सहन करावे लागलेल्या शेतकऱ्यांसमोर आता रब्बी हंगामाचेही संकट उभे ठाकले आहे. पावसाच्या आकडेवारीत दिसणारी ७० टक्क्यांची नोंद शेतकऱ्यांना दिलासा देणारी ठरलेली नाही. उलट, पाण्याअभावी रब्बीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात घटण्याची शक्यता निर्माण झाली असून, याचा परिणाम आगामी उत्पादनावर आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर होण्याची भीती आहे.

लेक लाडकी योजनेचा लाभ आता

स्तरावरून प्रकल्प कार्यालयाकडे पाठवले जात आणि पुढे जुन्या पोर्टलवर त्यांची नोंदणी केली जात असे. या प्रक्रियेत अर्जाची छाननी, कागदपत्रांची पडताळणी आणि मंजुरी अशा विविध टप्प्यांतून जावे लागत असल्याने लाभ मिळण्यास विलंब होण्याची शक्यता होती. ग्रामीण आणि दुर्गम भागातील कुटुंबांसाठी ही प्रक्रिया अधिकच त्रासदायक ठरत होती. विशेषतः ज्या गावांमध्ये अंगणवाडी केंद्र कार्यान्वित नव्हते किंवा संबंधित केंद्रापर्यंत पोहोचणे कठीण होते, अशा भागातील पात्र कुटुंबांना योजनेचा लाभ मिळवताना अडचणींचा सामना करावा लागत होता. अनेकदा केवळ अर्ज प्रक्रियेतील अडथळे आणि कागदपत्रांच्या पूर्ततेअभावी पात्र लाभार्थी योजनेपासून दूर राहण्याची शक्यता निर्माण होत होती. ही बाब लक्षात घेऊन महिला व बालविकास विभागाने संपूर्ण अर्ज प्रक्रियेचे पुनर्रचनाकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या व्यवस्थेमध्ये महाडीबीटी २.० पोर्टलला केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. यामुळे अर्ज नोंदणी, कागदपत्रांची छाननी, पडताळणी आणि मंजुरी या प्रक्रियांना डिजिटल स्वरूप देण्यात आले आहे. तसेच अर्जासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची संख्या कमी करून प्रक्रिया अधिक सुलभ करण्यावर भर देण्यात आला आहे. परिणामी, पालकांना अर्ज सादर करण्यासाठी वारंवार सरकारी कार्यालये किंवा अंगणवाडी केंद्रांमध्ये जाण्याची गरज कमी होणार आहे. या डिजिटल सुविधेचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे अर्जदारांना आपल्या अर्जाची सद्यस्थिती ऑनलाइन तपासता येणार आहे. अर्ज कोणत्या टप्प्यावर आहे, त्याची छाननी पूर्ण झाली आहे का किंवा मंजुरीची प्रक्रिया कुठपर्यंत पोहोचली आहे, याची माहिती मोबाईलवरून घेता येणार आहे. त्यामुळे अर्जाच्या स्थितीबाबत अनिश्चितता कमी होऊन संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्यास मदत होणार आहे.

थेट बँक खात्यात अनुदान

लेक लाडकी योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणारे आर्थिक अनुदान थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची व्यवस्था यापूर्वीच लागू करण्यात आली आहे. आता अर्ज प्रक्रियाही ऑनलाइन झाल्याने योजनेच्या अंमलबजावणीतील महत्त्वाचा टप्पा पूर्णपणे डिजिटल झाला आहे. यामुळे लाभार्थ्यांची नोंदणी आणि आर्थिक मदतीचे वितरण यामध्ये अधिक सुसूत्रता येण्याची अपेक्षा आहे. महिला व बालविकास विभागाच्या माहितीनुसार, राज्यात आतापर्यंत २ लाख ९८ हजार ६९५ लाभार्थ्यांना योजनेचा पहिला हप्ता वितरित करण्यात आला आहे. नव्या ऑनलाइन सुविधेमुळे योजनेची माहिती आणि अर्ज प्रक्रिया अधिकाधिक कुटुंबांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.

मुलींच्या शिक्षणासाठी आर्थिक आधार

लेक लाडकी योजना ही मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देणे, त्यांचे शिक्षण सुरू राहावे आणि भविष्यात त्यांना आर्थिक आधार मिळावा, या उद्देशाने राबविण्यात येत आहे. मुलीच्या जन्मापासून ते १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत विविध टप्प्यांवर आर्थिक मदत देण्याची या योजनेची तरतूद आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींमुळे मुलींचे शिक्षण थांबू नये आणि मुलींकडे पाहण्याचा सामाजिक दृष्टिकोन सकारात्मक व्हावा, हा या योजनेमागील प्रमुख हेतू आहे.

लातूरमध्ये कुरिअरच्या पार्सलमध्ये

घटनास्थळी दाखल झाले. यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनीही घटनास्थळाची पाहणी केली. दरम्यान, स्फोट झालेल्या वाहनात एक बंदूक आढळून आली आहे, त्यामुळे सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाल्या आहेत. याशिवाय हा स्फोट कशामुळे झाला? पार्सलमध्ये ज्वलनशील अथवा स्फोटक पदार्थ होते का? पार्सल नेमके कोणी आणि कुठून पाठवले? या पार्सलबाबत कुरिअर कंपनीला पूर्वकल्पना होती का? अशा सर्व दृष्टीने पोलीस तपास करत आहेत.

कुंभमेळ्यात विकासकामांच्या नावाखाली

पोस्ट करताना म्हटले की, अन्नदाता शेतकरी भीषण दुष्काळाच्या आगीत होरपळत असताना, हे सरकार त्याच्या हातावर ५ हजार रुपये टिकल्या टेकवून त्याची थट्टा करणार आणि दुसऱ्या बाजूला नाशिक कुंभमेळ्याच्या नावाखाली केल्या जाणाऱ्या ३५ हजार कोटी रुपये खर्चाचा कोणताही हिशोब द्यायला तयार नाही. कुंभमेळ्याच्या निधीतून होणाऱ्या कामांमध्ये प्रचंड अनियमितता, निकृष्ट दर्जा आणि भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप होत आहेत. यातील काही माहिती आमच्याकडं असून सरकारकडूनही ही माहिती मिळतेय का? हे पाहण्यासाठी एक लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही विविध शासकीय विभागांकडे पत्रव्यवहार केला, माहिती अधिकारात अधिकृत अर्ज दिले. परंतु, जाणीवपूर्वक ही माहिती दडवली जात आहे, असा आरोप त्यांनी केला.

राष्ट्रपतींच्या हस्ते सिंहस्थ

या पवित्र आणि ऐतिहासिक समारंभात सहभागी होण्याचे भाग्य लाभल्याचे सांगत त्यांनी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या प्राचीन परंपरेचा गौरव केला. नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभाची परंपरा जितकी प्राचीन आहे, तितकीच ती समृद्ध आहे. शतकानुशतके आयोजित होणारा कुंभमेळा हा भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक एकतेचे जिवंत प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले. गोदावरीच्या पवित्र तीरावर आयोजित महाआरतीने या सोहळ्याला विशेष आध्यात्मिक महत्त्व प्राप्त झाले. हरिद्वारचा गंगाकिनारा, प्रयागराजचा त्रिवेणी संगम, उज्जैनची क्षिप्रा आणि नाशिकचा गोदावरी तीर या ठिकाणी होणारे कुंभमेळे जगभर प्रसिद्ध आहेत. या धार्मिक सोहळ्यांच्या माध्यमातून लाखो भाविक एकत्र येतात. त्यातून भारताची सामाजिक समरसता, सांस्कृतिक विविधता आणि आध्यात्मिक एकता अधोरेखित होते, असे राष्ट्रपती म्हणाल्या. या सोहळ्याचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे नाशिक जिल्ह्यातील ६०० ते ६५० गावांमधून आलेल्या सुमारे सहा हजार आदिवासी बांधवांचा सहभाग. आदिवासी समाजाच्या मोठ्या उपस्थितीने कार्यक्रमाला सामाजिक समरसतेची जोड मिळाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात सनातन संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित केले. सनातन संस्कृती शाश्वत असून कुंभमेळा हे विविध पंथ आणि संप्रदायांना एकत्र आणणारे व्यासपीठ आहे. आदिवासी बांधवांचा सहभाग हीच या संस्कृतीची खरी ओळख असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सिंहस्थ कुंभमेळ्याचे अधिकृत गीत आणि संकेतस्थळाचे लोकार्पण करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या सोहळ्याला सिंहस्थ कुंभाच्या इतिहासातील सुवर्ण अध्याय असे संबोधले. आगामी कुंभमेळ्यासाठी देश-विदेशातून सुमारे १० ते १५ कोटी भाविक आणि साधू-संत नाशिकमध्ये दाखल होतील, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला. या पार्श्वभूमीवर कुंभमेळ्याच्या तयारीसाठी सुमारे ३२ हजार कोटी रुपयांची विकासकामे हाती घेण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली. राष्ट्रपतींनी आपल्या संबोधनात महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाचाही विशेष उल्लेख केला. प्रभू श्रीरामांचा वनवासकाळ, छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, स्वातंत्र्यवीर सावरकरांची जन्मभूमी आणि संतांची समृद्ध परंपरा यामुळे महाराष्ट्राला विशेष सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. देशाच्या औद्योगिक उत्पादनात महाराष्ट्राचा सुमारे १५ टक्के वाटा असल्याचा उल्लेख करत त्यांनी राज्याच्या आर्थिक योगदानाचेही कौतुक केले. सिंहस्थ कुंभमेळा हा केवळ धार्मिक सोहळा नसून युवा पिढीला भारताची महान संस्कृती, परंपरा आणि जीवनमूल्यांची ओळख करून देणारा महत्त्वपूर्ण उत्सव ठरेल, असा विश्वासही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केला.

आजच्या महारॅलीसाठी महाराष्ट्रातून

रस्त्यावरही लढला जात आहे. या आंदोलनाचा पुढचा भाग म्हणून ही महारॅली आयोजित करण्यात आली आहे. देशातील निवडणुका निष्पक्ष व पारदर्शकपणे होत नाहीत, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार हे मोदी-शाह यांच्या हातचे बाहुले बनून काम करत आहे. मतदार यादीत मोठा घोटाळा केला जात आहे. एसआयआरच्या नावाखाली १३ कोटी नावांची कपात करण्यात आली आहे. मतदानाचा अधिकार संविधानाने दिला आहे पण भाजपा सरकार निवडणूक आयोगाच्या मदतीने मतदानाचा हक्क हिरावून घेत आहे. भाजपा सरकार लोकशाही व संविधानाची पायमल्ली करत आहे, या विरोधात हा लढा आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे दिली आहे.

लोकतंत्र आहेच!

प्रत्यक्ष मतदारांमध्ये असलेली नाराजी दूर करण्यात त्यांना यश आले नाही. याशिवाय, महायुतीतील अंतर्गत धुसफूस आणि मित्रपक्षांच्या स्थानिक नेत्यांमधील नाराजीही या निवडणुकीत चव्हाण यांच्या अंगलट आल्याचे स्पष्ट दिसत आहे.या निवडणुकीचे सर्वात मोठे वैशिष्ट्ये म्हणजे दोन्ही बाजूंनी बड्या नेत्यांनी प्रचारात दाखवलेली अनास्था. विशेषतः महाविकास आघाडीकडून डॉ. प्रताप पाटील यांच्यासाठी मराठवाड्यातील कोणताही बडा नेता पूर्ण ताकदीने मैदानात उतरलेला दिसला नाही. जिल्ह्यातील प्रचारसभा किंवा कार्यक्रमांमध्ये नेत्यांची उपस्थिती ही केवळ हजेरी लावण्यापुरतीच मर्यादित राहिली. डॉ. प्रताप पाटील हे तुलनेने नवखे चेहरे असले, तरी आता बदल हवाच आणि चव्हाण नकोत हा चंग मराठवाड्यातील सुशिक्षित पदवीधरांनी आधीच बांधला होता. नेत्यांनी प्रचार शिथिल ठेवला तरी पदवीधरांनी शांतपणे मतपेटीतून आपला रोष व्यक्त केला आणि डॉ. पाटील यांच्या पारड्यात एकतर्फी कौल दिला. यामुळे नेत्यांच्या मेहेरबानीवर नव्हे, तर सुशिक्षित मतदारांच्या ठाम भूमिकेमुळे हा विजय साकार झाला आहे. त्यामुळेच, 'हा नेत्यांचा खेळ नसून मतदारांचा प्रताप आहे आणि लोकशाही आजही जिवंत आहे,' अशीच प्रतिक्रिया मराठवाड्याच्या राजकीय पटलावरून उमटत आहे.

मतचोरी रोखण्यासाठी

यांसारख्या तपास यंत्रणांचा गैरवापर केल्याचा आरोप करत आता मतांची चोरी केली जात असल्याचे खर्गे म्हणाले. मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त (नियुक्ती, सेवेच्या अटी आणि पदाचा कालावधी) कायदा, २०२३ मुळे निवडणूक आयुक्तांना संरक्षण मिळाले असून, या कायद्याने मतांच्या कथित चोरीला मदत केल्याचा आरोपही त्यांनी केला. डिसेंबर २०२३ मध्ये विरोधी पक्षांच्या १४५ खासदारांना निलंबित केल्यानंतर हा कायदा मंजूर करण्यात आल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. निवडणूक आयुक्तांना देण्यात आलेले संरक्षण हे राष्ट्रपती किंवा भारताच्या सरन्यायाधीशांनाही नसल्याचे सांगत त्यांनी या तरतुदींवर आक्षेप नोंदवला. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा संदर्भ देत खर्गे यांनी मतदार यादीत ४० लाख नवीन नावे समाविष्ट झाल्याचा दावा केला. या बदलांचा निवडणूक निकालावर परिणाम झाल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच विशेष सारांश पुनरीक्षण प्रक्रियेदरम्यान पाचपट अधिक नावे वगळण्यात आल्याचे सांगत, हे सर्व पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या संगनमताने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या माध्यमातून घडवून

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. ०१ नोव्हेंबर २०२६

थोडक्यात



सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांना अभिवादन

बीड :- भारताचे पहिले उपपंतप्रधान, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आणि देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या स्मृतीदिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करण्यात येत असल्याने निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी उपस्थित अधिकारी - कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय एकतेची शपथ दिली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'एनसीईआरटी' ने पाठ्यपुस्तकातून वादग्रस्त नकाशा वगळला

बीड । प्रतिनिधी

इयत्ता आठवीच्या एनसीईआरटीच्या इतिहास पुस्तकामध्ये मराठा साम्राज्याच्या नकाशात करण्यात आलेल्या बदलांबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत होती. या प्रकरणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय शिक्षण मंत्र्यांकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून, एनसीईआरटीने संबंधित वादग्रस्त नकाशा पाठ्यापुस्तकातून हटविण्याचा मोठा निर्णय घेतला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले मराठा साम्राज्य आणि पेशवेकाळात भारतीय उपखंडात झालेला त्याचा विस्तार हा भारतीय इतिहासाचा अत्यंत गौरवशाली अध्याय आहे. मात्र, इयत्ता आठवीच्या 'एक्सप्लोरिंग सोसायटी: इंडिया अँड बियाँड' या पाठ्यपुस्तकात सन १७५९ च्या मराठा साम्राज्याच्या विस्ताराचा जो नकाशा दिला होता, त्यात विशेषत: राजस्थानमधील जैसलमेर क्षेत्राबाबत दर्शवलेल्या माहितीवरून विविध आक्षेप आणि टिप्पण्या प्राप्त झाल्या होत्या. या बदललेल्या स्वरूपामुळे मराठा साम्राज्याचा विस्तार आणि प्रभाव कमी दाखवला जात असल्याची भावना निर्माण होऊन महाराष्ट्रात तीव्र संताप व्यक्त होत होता. या गंभीर प्रकरणाची दखल घेत बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी १६ एप्रिल २०२६ रोजी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पत्र लिहून या प्रकारावर तात्काळ आक्षेप नोंदवला होता. ऐतिहासिकदृष्टीने योग्य आणि प्रमाणिक नकाशा पूर्ववत करावा, अशी मागणी त्यांनी केली होती. खा.सोनवणे यांच्या या पत्राची गंभीर दखल घेत शिक्षण मंत्रालयाने आणि एनसीईआरटीने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी एका उच्चस्तरीय समितीची स्थापना केली होती. या उच्चस्तरीय समितीने प्राप्त झालेल्या सर्व सूचना व मानदंडांचे परीक्षण करून संबंधित नकाशा पाठ्यपुस्तकातून मागे घेण्याची आणि विद्यार्थ्यांच्या हितातून तो पूर्णपणे वगळण्याची शिफारस केली. केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) जयंत चौधरी यांनी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी खा.बजरंग सोनवणे यांना पत्र पाठवून या कारवाईची अधिकृत माहिती दिली आहे. तसेच, भारतीय इतिहासातील या महत्त्वपूर्ण अध्यायाला देशातील सर्व विद्यार्थी वर्गासमोर योग्य गरिमा आणि पूर्ण सन्मानाने मांडले जाईल, असे स्पष्ट करत मराठा इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनाक्रम योग्य ठिकाणी सामाविष्ट करण्यासाठी तज्ज्ञ समितीच्या माध्यमातून काम सुरू असल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा विद्यार्थ्यांशी रंगला मुक्त संवाद

संवादादरम्यान उलगडली यशाची गुपिते, शासकीय सुट्टीच्या दिवशी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

बीड । प्रतिनिधी

स्पर्धा परीक्षा असो वा आयुष्यातील कोणतेही ध्येय, कष्टाला आणि सातत्याला पर्याय नाही. यशाचा कोणताही शॉर्टकट नसतो, तर नियोजनबद्ध दैनंदिनी आणि आत्मविश्वासाच्या जोरावरच यशशिखर गाठता येते, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने शनिवार, दि.३१ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित कलेक्टरांशी गप्पा या अभिनव उपक्रमात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी वडवणी तालुक्यातील सोन्नाखोटा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. कार्यक्रमाला जिल्हा नियोजन अधिकारी शिला मिसाळ, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी श्री.इगारे, शिक्षण विभागाचे अधिकारी प्रमुख उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी स्वतःची दैनंदिनी कशी असावी यावर प्रकाश टाकला. यामध्ये दिवसाची सुरुवात लवकर करून अभ्यासाचे तास निश्चित करावेत. दररोज वर्तमानपत्रे आणि दर्जेदार पुस्तकांचे वाचन अवांतर ज्ञानासाठी आवश्यक आहे. अपयशाने खचून न जाता, चुकांमधून शिकून पुढे जावे. अभ्यासासोबतच पुरेशी झोप, व्यायाम आणि ध्यानधारणा अत्यंत गरजेची असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांनी अत्यंत सोप्या भाषेत निरसन केले. त्यांच्या या मार्गदर्शनाने उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये एक नवा उत्साह आणि ऊर्जा पाहायला मिळाली.

कलेक्टरांशी गप्पा या नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत विद्यार्थी-कलेक्टर संवाद सत्र-३ अत्यंत उत्साही आणि हसतखेळत वातावरणात संपन्न झाले. विशेष म्हणजे, शासकीय सुट्टीच्या दिवशी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन



यांनी आपली कर्तव्यदक्षता दाखवत विद्यार्थ्यांसाठी तब्बल दोन तास वेळ दिला आणि त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला.या संवाद सत्रा दरम्यान जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत शाळेतील सुविधाविषयी सविस्तर माहिती जाणून घेतली. यामध्ये शाळेतील खेळाची जागा, मुलांची खेळाविषयीची आवड, शालेय पोषण आहार, जेवणाची व्यवस्था, वर्गखोल्यांची स्थिती, सुलभ शौचालय आणि पिण्याच्या पाण्याची सोय या मुद्द्यांचा समावेश होता. याशिवाय शाळेत नियमित न येता दांडी मारणारे विद्यार्थी कोण आहेत, कोणाला पोहण्याची आवड आहे आणि किती मुलांनी पर्यटन स्थळांना भेटी दिल्या आहेत, याचीही त्यांनी आपुलकीने विचारपूस केली. मुलांना कोणत्या गोष्टींमधून सर्वाधिक आनंद मिळतो, हे समजून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आपल्या बालपणाच्या आठवणींना उजाळा दिला. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले, माझे शालेय शिक्षण केंद्रीय विद्यालयात पुर्ण झाले आहे. केरळमध्ये फुटबॉल मोठ्या प्रमाणात खेळला जातो, तिथे मल्याळम चित्रपटसृष्टीत जिल्हाधिकारी आणि पोलिस अधिक्षक यांच्यावर आधारित अनेक चित्रपट असतात. ते चित्रपट पाहूनच मला जिल्हाधिकारी होण्याची प्रेरणा मिळाली. अगदी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या मुलाखतीतही मला प्रेरणा कशी मिळाली हाच प्रश्न विचारण्यात आला होता. यावर मार्गदर्शन करताना ते पुढे म्हणाले की, तुम्हाला प्रेरणा कुठून मिळते यापेक्षा तुम्ही त्यानंतर घेतलेले परिश्रम आणि प्रयत्न किती प्रामाणिक आहेत, हे जास्त महत्त्वाचे आहे. युपीएससी परीक्षा देऊन कशाप्रकारे कलेक्टर आणि एसपी होता येते, तसेच जिल्हाधिकाऱ्यांची कामे आणि त्यांची एकूण कार्यपद्धती कशी असते, हे त्यांनी सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.या संवाद सत्राचा समारोप करताना जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी विद्यार्थ्यांना आयुष्याचा एक मोठा मंत्र दिला. तुम्ही भविष्यात कलेक्टर, इंजिनिअर, डॉक्टर काहीही व्हा, पण मोठे झाल्यावर आपल्या गावाला आणि जिल्ह्याला कधीही विसरू नका. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून आपल्या गावासाठी नक्की काहीतरी करा. तसेच विद्यार्थ्यांनी नेहमी जात-धर्म बाजूला ठेवून अगोदर माणुसकी जपली पाहिजे, कारण जगात माणुसकीच सर्वात महत्त्वाची आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी मुख्याध्यापक आश्रोबा मुंडे, शिक्षक किशोर ढवळशंख, सुभाष चिकाळकर, श्रीमती वत्सला गुरसाळी यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. चि. आदर्श डोंगरे याने आपल्या कौटुंबिक परिस्थितीची माहिती देताना सांगितले की, त्याचे वडील रिक्षा चालवून आणि आई शेतीकाम करून अत्यंत कष्टाने घराचा उदरनिर्वाह करतात, अशा प्रतिकूल परिस्थितीतही जिद्दीच्या जोरावर शिकून भविष्यात एक कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी होण्याचे त्याचे स्वप्न असल्याचे बोलुन दाखविले. चि. साहिल सय्यद याने अत्यंत आत्मविश्वासाने आपले ध्येय मांडताना सांगितले की, मी उच्च शिक्षण घेवून पोलीस अधिकारी होणार आणि बीड जिल्ह्याचे संरक्षण करणार आहे.

धानोरा गावचे माजी सरपंच आडागळे यांची भाजपच्या प्रमुख संघटकपदी नियुक्ती!

आ.धस यांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र प्रदान; भाजप संघटनात्मक जबाबदारीत वाढ

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील धानोरा गावचे माजी सरपंच तथा लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जाणारे महादेव रामभाऊ आडागळे यांची भारतीय जनता पार्टीच्या आष्टी तालुका प्रमुख संघटकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे धानोरा गावासह परिसरातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने आडागळे यांना दिलेल्या नियुक्तीपत्रात पक्ष संघटनेतील त्यांचे योगदान, सामाजिक व राजकीय कार्यातील सक्रिय सहभाग आणि कार्यकर्त्यांशी असलेला समन्वय विचारात घेऊन ही जबाबदारी



सोपविण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पक्षाचे ज्येष्ठ नेते चंद्रकांतदादा पाटील तसेच लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षसंघटनेचे काम अधिक प्रभावीपणे पुढे नेण्याची अपेक्षा या नियुक्तीतून व्यक्त होत आहे. आज आमदार सुरेश आण्णा धस यांच्या अद्वैतचंद्र निवासस्थानी त्यांच्या उपस्थितीत महादेव आडागळे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य लालासाहेब शिंदे सदस्य नवनाथ चखाले,संतोष रणसिंग, भगवानराव भोसले सचिन गाडे ग्रामपंचायत सदस्य खालेद सय्यद ,महादेव आडागळे लहुजी वस्ताद संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. आडागळे यांनी सरपंचपदाच्या कार्यकाळात गावाच्या विकासासाठी केलेले काम तसेच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील सक्रियता यामुळे त्यांची परिसरात स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. आता भाजपच्या प्रमुख संघटकपदाची जबाबदारी मिळाल्याने पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करणे, कार्यकर्त्यांना एकत्रित ठेवणे आणि पक्षाची ध्येयधोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे, अशी महत्त्वाची कामे त्यांच्याकडून अपेक्षित आहेत.या नियुक्तीबद्दल महादेव आडागळे यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत असून, आगामी काळात त्यांच्या नेतृत्वाखाली आष्टी तालुक्यात भाजप संघटनेला अधिक बळ मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे.

पान ६ वरून...

बीड-कोळवाडी घाटात

घटनास्थळी धाव घेतली. रस्त्याच्या मधोमध वाहने अडकल्याने घाटाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. तासनतास प्रवाशांना कोंडीत अडकून राहावे लागले. पोलिसांनी क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहने बाजूला करत अखेर तातपुरत्या स्वरूपात एकेरी वाहतूक सुरू करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

कोळवाडी घाट हा नेहमीच अपघातांचा केंद्रबिंदू ठरत आहे. धोकादायक वळणे, चढ-उतार आणि अवजड वाहनांची वर्दळ यामुळे येथे सातत्याने निष्पाप प्रवाशांचा बळी जात आहे. हा मार्ग जीवघेणा ठरत असल्याने केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी स्वतः या विषयाची दखल घ्यावी, घाटाचे रुंदीकरण, वळणे सरळ करणे आणि सुरक्षा कठडे उभारणे यांसारख्या ठोस उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी तीव्र मागणी परिसरातील नागरिक व वाहनधारकांमधून केली जात आहे.

तिर्थपुरीतील आंतरजिल्हा टोळीच्या

तीन अडवून चौघांनाही शिताफीने ताब्यात घेतले.

चौकशीत चार गुन्ह्यांची कबुली

ताब्यात घेतलेल्या संशयितांकडे सखोल विचारपूस केली असता, त्यांनी बीड जिल्ह्यातील विविध भागांत चोऱ्या केल्याची कबुली दिली. या कारवाईमुळे खालील गुन्हे उघडकीस आले आहेत: नेकनूर पोलीस ठाणे: गु.र.नं. ४४१/२०२६ (कलम ३०५, ३३१(४) धारूर पोलीस ठाणे: गु.र.नं. १०/२०२६ (कलम ३०५, ३३१(४) केज पोलीस ठाणे: गु.र.नं. ६२४/२०२६ (कलम ३०३(२) BNS) दिंद्रुड पोलीस ठाणे: गु.र.नं. ०९/२०२६ (कलम ३०५, ३३१(४) आरोपींकडून ९ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, त्यांना पुढील कायदेशीर कारवाईसाठी मुद्देमालासह नेकनूर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

तपास पथक सदरची उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहायक पोलीस अधीक्षक व्यंकटराम आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने, पोलीस अंमलदार बप्पासाहेब घोडके, जफर पठाण, महेश जोगदंड, दिलीप गित्ते, गणेश मराडे आणि विकी सुरवसे यांच्या पथकाने पार पाडली.

थकीत वेतनासाठी कामगार गव्हाणीत

तसेच नवीन कामगारांनी कामावर रुजू होऊ नये आणि कामगारांच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. आंदोलनादरम्यान कामगारांना कोणीही अडथळा आणू नये, अशी विनंतीही युनियनने केली आहे.

प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष या प्रकरणी जिल्हाधिकारी, आमदार सुरेश (आण्णा) धस, माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी आमदार बाळासाहेब आजबे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शेख महेबुब, कारखान्याचे कार्यकारी संचालक आणि आष्टी पोलीस निरीक्षक यांनाही निवेदनाच्या प्रती पाठविण्यात आल्या आहेत. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या ५०७ कामगारांच्या थकीत वेतनाचा प्रश्न, न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी आणि कामगारांचा आत्मदहनाचा इशारा या पार्श्वभूमीवर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे आता संपूर्ण आष्टी तालुक्याचे लक्ष लागले आहे. कामगारांच्या थकीत वेतनाचा प्रश्न मार्गी लागण्यार की उद्घाटनाच्या दिवशीच आंदोलनाचा भडका उडणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दुष्काळी परिस्थितीमुळे मजूर

शासनाच्या रोजगार हमी योजनेचा मूळ उद्देश ग्रामीण भागातील गरजू मजुरांना त्यांच्या गावातच रोजगार उपलब्ध करून देणे हा आहे. त्यामुळे दुष्काळसदृश परिस्थितीचे गांभीर्य ओळखून प्रशासनाने केवळ आश्वासनांवर न थांबता प्रत्यक्ष कामे सुरू करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत. मजुरांची नोंदणी, कामांची आखणी आणि आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून जास्तीत जास्त मजुरांना रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. दुष्काळाचा फटका शेतकऱ्यांबरोबरच शेतमजुरांनाही बसत असून, रोजगाराअभावी त्यांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ येण्यापूर्वी प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि तत्परतेने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा या वेळी व्यक्त करण्यात आली. या वेळी भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे भाई विष्णुपंत घोलप व राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल जाधव यांच्या सह जयाताई जावळे, सिंधु घोलप, काशिबाई विर, सय्यद सुन्नाबी, शेख रिजवाना, जाधव गंगुबाई, नाईकवाडे मिरा, चव्हाण ताई, पारवे शितल, तरटे ताई, तेजलताई, राजुबाई वीर, कांचन नाईकवाडे व इतर मोठ्या संख्येने मजूर महिला उपस्थित होत्या.

अंबाजोगाईत भूमी अभिलेख

प्रशासकीय यंत्रणेवर राजकीय बलाचा व पैशाच्या जोरावर दबाव आणून बेकायदेशीर कामे करून घेत आहेत. या मागे आमच्या जमिनी बळकावण्याचा हेतू आहे. त्यामूळे आमच्यावर अन्याय झाला आहे.संबंधित जमीन प्रकरणात राजकीय दबावाखाली कामकाज होत असल्याचा आरोपही अर्जदाराने केला आहे. जमीन मोजणीची कागदपत्रे, जुने अहवाल, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आदेश आणि प्रत्यक्ष जागेची परिस्थिती यांची स्वतंत्रपणे चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. मोजणी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, अहवालातील कथित त्रुटी दूर कराव्यात, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशांची अंमलबजावणी तपासावी आणि दोष आढळल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी या मागण्या घेऊन या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून न्याय न मिळाल्यास २ नोव्हेंबर २०२६ पासून अंबाजोगाई तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी या निवेदनाद्वारे दिला आहे. दरम्यान, अर्जदाराने केलेल्या आरोपांबाबत भूमी अभिलेख कार्यालयाची अधिकृत भूमिका समोर आलेली नाही. त्यामुळे या प्रकरणात प्रशासन काय भूमिका घेते आणि संबंधित तक्रारींचे निराकरण कसे केले जाते, याकडे अंबाजोगाईकरांचे लक्ष लागले आहे.

ऋतुजा मुंडे हीचे बीएएमएस परीक्षेत घवघवीत यश

केज । प्रतिनिधी

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकच्या वतीने घेण्यात आलेल्या बी.ए.एम.एस. फायनल परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, यामध्ये डॉ. दीपक पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड रिसर्च सेंटर, बोरपाडले, कोल्हापूर येथील गुणवंत विद्यार्थिनी कु. ऋतुजा शिवदास मुंडे हिने दैदिप्यमान यश संपादन केले आहे. तिने प्रथम वर्षात ६९ टक्के, दुसऱ्या वर्षात ७० टक्के आणि अंतिम फायनल परीक्षेत ६८.५८ टक्के (२५५० पैकी १७४९ गुण) असा सातत्यपूर्ण व उच्च गुणानुक्रम राखत हे यश मिळवले आहे. केवळ वैद्यकीय शिक्षणातच नव्हे, तर इतर कलागुणांमध्येही ऋतुजा हिने आपले कौशल्य सिद्ध केले आहे. तिने अनेक राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावून फिरती ढाल, फिरता चषक आणि अनेक ट्रॉफी जिंकून



विशेष मजल मारली असून, विविध व्यासपीठांवर आपल्या अवांतर व्यासंगाची छाप पाडली आहे

आयुर्वेद उपचार पद्धतीचा प्रसार करून याद्वारे आरोग्य क्षेत्रात एक अत्यंत वेगळे आणि उल्लेखनीय करिअर घडवण्याचा तिचा ठाम मानस आहे. आपल्या या यशाचे श्रेय तिने कठोर परिश्रम, आई-वडिलांचे आशीर्वाद आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाला दिले आहे. तिच्या या उज्वल यशाबद्दल आणि बहुआयामी गुणवत्तेबद्दल सर्वत्र कौतुक होत असून ती ज्येष्ठ पत्रकार शिवदास मुंडे व शिवसेना महिला आघाडी शिंदे गटाच्या संपर्क प्रमुख रत्नमाला मुंढे यांची कन्या आहे.

डॉ.ऋतुजा मुंडे हिने वैद्यकीय क्षेत्रात घवघवीत यश संपादन केल्याने तीचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन केले जात आहे व पुढील वैद्यकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या धामणगाव परिसरात पाणीटंचाई गंभीर

धामणगाव आणि वाड्या वस्त्यांवरील पाणीपुरवठा सुरळीत करा युवा नेते अमोल भैया चौधरी यांची मागणी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील मोठे बाजारपेठ असलेले व सर्वाधिक उत्पन्न असलेली ग्रामपंचायत धामणगाव आणि परिसरात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. नागरिकांसह दुधाळ जनावरांनाही पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असून, प्रशासनाकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. मात्र, धामणगाव परिसरातील अनेक वाड्या-वस्त्यांवर टँकर वेळेवर पोहोचत नसल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे गावासह परिसरातील सर्व वाड्या-वस्त्यांवर टँकरद्वारे नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी युवा नेते अमोल भैया चौधरी यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन दिले असून, प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे.

धामणगाव आणि परिसरातील बहुतांश शेतकरी दुग्धव्यवसायावर अवलंबून आहेत. अनेक शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात दुधाळ जनावरे असल्याने त्यांना दररोज पुरेशा पाण्याची आवश्यकता असते. मात्र, दुष्काळी परिस्थितीमुळे पाण्याचे स्रोत आटत चालले असून, नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. अशा परिस्थितीत जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर झाला आहे. नागरिक आणि पशुधनाची तहान भागविण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असला, तरी काही वाड्या-वस्त्यांपर्यंत टँकर पोहोचत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.



युवा नेते अमोल भैया चौधरी यांनी गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात धामणगाव परिसरातील महाजनवाडी, डागाड वस्ती, सावकार वस्ती, खोसारी, हाडोळा, गाढवे व मुळे वस्ती वस्ती, वडाचा मळा, केदारे वस्ती, केवड्याचा मळा, लोखंडे वस्ती, पाथर्डी रोड परिसर, पोकळे वस्ती, कडा रोड आणि गुळगुळ बेट, ढोबळे वस्ती आणि भवर वस्ती या भागातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न मांडला आहे. या वाड्या-वस्त्यांवर टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा सुरळीत होत नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असून, प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना पिण्यासाठी तसेच शेतकऱ्यांच्या दुधाळ जनावरांना आवश्यक असलेले पाणी वेळेवर उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे. त्यामुळे संबंधित विभागाने प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून पाणीटंचाई असलेल्या सर्व वाड्या-वस्त्यांपर्यंत टँकर पोहोचतील, याची दक्षता घ्यावी. तसेच पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करून कोणत्याही वस्तीवर पाण्याअभावी नागरिकांचे हाल होणार नाहीत, यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी चौधरी यांनी केली आहे. येत्या तीन ते चार दिवसांत धामणगाव आणि परिसरातील सर्व वाड्या-वस्त्यांवर टँकरद्वारे सुरळीत पाणीपुरवठा सुरू न झाल्यास आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा अमोल भैया चौधरी यांनी दिला आहे. त्यामुळे आता संबंधित प्रशासन या पाणीटंचाईच्या प्रश्नावर कितपत गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना करते, याकडे धामणगाव परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

नगरपंचायत पाटोदाकडे १७ टँकर, तरी नागरिकांना १५ ते २० दिवसांनी पाणी!

पाणीपुरवठ्याच्या नियोजनाचा अभाव की टँकरच्या खेपांमध्ये अनियमितता? शिवभूषण जाधव यांचा सवाल

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात दिवसेंदिवस तीव्र होत चाललेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नगरपंचायतीकडे एकूण १७ टँकर मंजूर असतानाही नागरिकांना १५ ते २० दिवसांनी पाणी मिळत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. शहरात पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन होत आहे का? टँकरच्या निर्धारित खेपा प्रत्यक्षात होतात का? नगराध्यक्ष आणि नगरसेवकांचे याकडे दुर्लक्ष होत आहे का? की या संपूर्ण व्यवस्थेवर देखरेख ठेवणारी यंत्रणाच कुचकामी ठरत आहे? असा सवाल शिवभूषण जाधव यांनी उपस्थित केला आहे.

यापूर्वी शहरातील अनेक भागांत खासगी बोअरवेल, हातपंप आदी पाण्याचे स्रोत सुरू असल्याने नागरिकांची पाण्याची गरज काही प्रमाणात भागत होती. मात्र आता परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. शहरातील बहुतांश खासगी बोअरवेल व हातपंप बंद पडले असून, पैसे देऊन पाणी विकत घ्यायचे म्हटले तरी सहजासहजी पाणी उपलब्ध होत नाही. त्यामुळे शहरातील नागरिकांची संपूर्ण भिस्त सध्या नगरपंचायतीच्या टँकरवर अवलंबून आहे. आगामी काळात पाण्याची परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता असून, महिनाभरानंतर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतो, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली.

नगराध्यक्ष, नगरसेवक आणि प्रशासनाने पाणीप्रश्न गांभीर्याने घेण्याची गरज; पारदर्शक नियोजनासाठी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

दररोज ६ लाख ८० हजार लिटर पाणी उपलब्ध होण्याची क्षमता!

शिवभूषण जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, पाटोदा शहरासाठी एकूण १७ टँकर मंजूर असून प्रत्येक टँकरच्या दररोज दोन खेपा अपेक्षित आहेत. त्यानुसार दररोज सुमारे ६ लाख ८० हजार लिटर पाणी उपलब्ध होऊ शकते. यामध्ये मांजरा नदी पुलाच्या अलीकडील भागासाठी ७ टँकर, पुलाच्या पलीकडील माऊली नगर, शिवाजीनगर व मांजरसुंबा रोड परिसरासाठी ७ टँकर, तर ग्रामीण भाग व वस्त्यांसाठी ३ टँकर अशी विभागणी करण्यात आली आहे. मांजरा नदी पुलाच्या अलीकडील भागात अडीच लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी असून, सात टँकरच्या माध्यमातून नियमित पाणी भरल्यास नागरिकांना नियोजनबद्ध पाणीपुरवठा करता येऊ शकतो. क्रांतीनगर, मोहल्ला परिसर, माळी गल्ली, रस्ता गल्ली, ब्राह्मण गल्ली, पाटील गल्ली आणि दलित वस्ती अशा भागांचे दिवसनिहाय नियोजन केल्यास किमान चार ते पाच दिवसांत पाणीपुरवठा करणे शक्य होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच माऊली नगर व शिवाजीनगर परिसरातील अडीच लाख लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाकीमध्ये सात टँकरच्या माध्यमातून पाणी उपलब्ध करून दिल्यास एक दिवसाआड पाणीपुरवठा करणेही शक्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

केवळ टीका नको, आता जबाबदारीने काम करण्याची वेळ!

हा प्रश्न कोणावर टीका करण्यासाठी किंवा राजकारण करण्यासाठी उपस्थित केलेला नाही. काळ अत्यंत कठीण आहे. प्रत्येक गोष्टीतून आर्थिक फायदा शोधण्याचे धोरण बाजूला ठेवून सेवा आणि जबाबदारीच्या भावनेतून काम करण्याची गरज आहे. नगरपंचायतीचे अधिकारी, कर्मचारी, सर्व पदाधिकारी, नगराध्यक्ष, नगरसेवक आणि नागरिकांनी एकत्र येऊन पाणीप्रश्नावर काम केले पाहिजे. योग्य नियोजन केले तर उपलब्ध साधनसामग्रीतूनही नागरिकांना दिलासा देता येऊ शकतो, असे आवाहन शिवभूषण जाधव यांनी केले.

पाणीपुरवठ्यात पारदर्शकता आणण्यासाठी तीन महत्त्वाच्या मागण्या

पाणीपुरवठ्याचे नियोजन अधिक पारदर्शक आणि प्रभावी व्हावे, यासाठी शिवभूषण जाधव यांनी नगरपंचायत पाटोदाचे मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन पुढील उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

सर्व १७ टँकरचे क्रमांक प्रसिद्ध करावेत!

शहरासाठी मंजूर असलेल्या सर्व १७ टँकरचे क्रमांक सार्वजनिक करावेत. कोणता टँकर कोणत्या प्रभागात किंवा भागात पाणीपुरवठा करणार आहे, याची स्पष्ट माहिती नागरिकांना उप

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
रविवार दि.१ नोव्हेंबर २०२६
४

शुल्कमुक्त कापूस आयातीला डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

देशांतर्गत तेजीला लगाम लागण्याची शक्यता, शेतकऱ्यांना चांगल्या दराची अपेक्षा

पुणे / प्रतिनिधी

देशांतर्गत बाजारात कापसाच्या दरात सुरू असलेल्या तेजीला लगाम घालण्यासाठी केंद्र सरकारने शुल्कमुक्त कापूस आयातीला आणखी दोन महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे आता ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत परदेशातून आयात होणाऱ्या कापसावर कोणतेही आयात शुल्क आकारले जाणार नाही. सरकारच्या या निर्णयामुळे कापूस आयात वाढण्याची शक्यता असून, त्याचा परिणाम देशांतर्गत बाजारातील दरांवर होऊ शकतो. परिणामी, कापसाच्या भाववाढीच्या अपेक्षेने विक्री रोखून धरणाऱ्या शेतकऱ्यांच्या पदरी अपेक्षेपेक्षा कमी दर पडण्याची शक्यता कापूस बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केली आहे.

यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे देशातील कापूस उत्पादनात मोठी घट होण्याचा अंदाज आहे. उत्पादन घटल्याने बाजारात कापसाची आवक मर्यादित आहे. दुसरीकडे उद्योगांकडून कापसाला चांगली मागणी असल्याने दरात वाढ झाली आहे. सामान्यतः ऑक्टोबरमध्ये नवीन हंगामातील कापसाची आवक सुरू झाल्यानंतर बाजारभावात नरमाई येते. मात्र, यंदा उत्पादनातील संभाव्य घट आणि मागणी यामुळे हंगामाच्या सुरुवातीलाच कापसाचे दर टिकून आहेत. त्यामुळे शेतकरीही अपेक्षित भाव मिळेपर्यंत कापूस विक्री करण्यास घाई करत नसल्याचे चित्र आहे. दरम्यान, कापसाचे



वाढते दर लक्षात घेऊन वस्त्रोद्योग क्षेत्रातील कंपन्यांनी केंद्र सरकारकडे शुल्कमुक्त आयातीची मुदत वाढविण्याची मागणी केली होती. उद्योगांच्या मागणीची दखल घेत सरकारने हा निर्णय घेतला आहे. यापूर्वी १ जून ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत कापूस आयातीवरील ११ टक्के शुल्कातून सूट देण्यात आली होती. ही मुदत ३१ ऑक्टोबरला संपणार होती. मात्र, ३० ऑक्टोबर रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार आता ही सवलत आणखी दोन महिन्यांसाठी वाढविण्यात आली आहे. त्यामुळे आयातदार उद्योगांना डिसेंबरअखेरपर्यंत शुल्क न भरता कापूस आयात करता येणार आहे. शुल्कमुक्त आयातीमुळे परदेशातून येणारा कापूस देशांतर्गत उद्योगांना तुलनेने स्वस्त पडू शकतो. परिणामी, आयात वाढल्यास देशातील कापसाची मागणी आणि पुरवठा यांचे समीकरण बदलण्याची शक्यता आहे. उत्पादन घटल्यामुळे कापसाच्या दरात आणखी वाढ होईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. विशेषतः ३१ ऑक्टोबरनंतर शुल्कमुक्त आयातीची सवलत संपल्याने दिवाळीनंतर दरात चांगली सुधारणा होईल, असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र, मुदतवाढीच्या निर्णयामुळे या तेजीवर मर्यादा येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातही मागील दोन आठवड्यांपासून कापसाच्या दरात चढ-उतार सुरू आहेत. आठवड्याच्या अखेरच्या शुक्रवारी आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाचा भाव प्रतिपाउंड ७८ सेंटच्या आसपास बंद झाला. भारत हा चीननंतर जगातील दुसऱ्या क्रमांकाचा कापूस उत्पादक देश आहे. अशा परिस्थितीत भारताने आयातीवरील शुल्कमाफी कायम ठेवल्याने आंतरराष्ट्रीय बाजारातील मागणीवरही परिणाम होऊ शकतो. सोमवारी आंतरराष्ट्रीय बाजारात सुधारणा होण्याची शक्यता अभ्यासकांनी व्यक्त केली असली, तरी देशांतर्गत बाजारात आयातीच्या निर्णयामुळे कापसाच्या दरांवर दबाव राहण्याची शक्यता आहे. एकीकडे उत्पादनातील घट आणि दुसरीकडे शुल्कमुक्त आयातीला मिळालेली मुदतवाढ, अशा दुहेरी परिस्थितीत यंदाचा कापूस हंगाम शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. उद्योगांना स्वस्त कच्चा माल उपलब्ध करून देण्याच्या सरकारच्या निर्णयाचा फायदा वस्त्रोद्योगाला होऊ शकतो; मात्र त्याचवेळी कापसाला चांगला भाव मिळण्याच्या शेतकऱ्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरण्याची भीती व्यक्त होत आहे.

ग्रेन ड्रायर शेतकऱ्यांसाठी वरदानच



ग्रेन ड्रायर म्हणजे धान्य सुकविण्याचे किंवा वाळविण्याचे यंत्र. हे ड्रायर मका, गहू, तांदूळ आणि इतर यांसारख्या कापणी केलेल्या धान्यांचा ओलावा कमी करण्यासाठी शेतीमध्ये वापरले जाणारे यंत्र आहे. कापणीनंतर, धान्यांमध्ये अनेकदा मोठ्या प्रमाणावर आर्द्रता असते, ज्यामुळे साठवण दरम्यान धान्य खराब होऊ शकते. त्यासाठी धान्यातील ओलावा झटपट शोषून घेणारे ग्रेन ड्रायर अतिशय उपयुक्त ठरते. अर्थात, किंमती तुलनेने जास्त असल्याने हे यंत्र आजवर सर्वसाधारण शेतकऱ्यांच्या आवाक्यापलीकडे होते. काही कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी सामान्य शेतकऱ्यांसाठी स्वस्तातील ग्रेन ड्रायर यंत्र विकसित केले आहे. साठवणुकीसाठी मका अनेकदा रस्त्यावर वाळवला जातो. यासाठी अनेक दिवस लागतात आणि मक्याचा दर्जाही कमी होतो. एवढेच नाही तर मक्यातील पोषक घटकही कमी होतात. शेतकऱ्यांची ही अडचण पाहून बिहार कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी सामान्य शेतकऱ्यांसाठी हे लहान प्रमाणावरील मका सुकवण्याचे यंत्र विकसित केले आहे.

शेतकऱ्यांसाठी ठरणार उपयुक्त :मक्यात जास्त आर्द्रता असल्याने ती सुरक्षित ठेवणे ही मोठी समस्या आहे. वाळवण यंत्र (ड्रायर) शेतकर्यांसाठी अतिशय उपयुक्त ठरणार आहे. त्याचा चाचणी वापर सध्या काही शेतकऱ्यांच्या कोठारात केला जात आहे. आगामी काळात त्याचा विस्तार करून शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिला जाईल.

ग्रेन ड्रायर म्हणजे काय? ग्रेन ड्रायर हे मका, गहू, तांदूळ आणि इतर यांसारख्या कापणी केलेल्या धान्यांचा ओलावा कमी करण्यासाठी शेतीमध्ये वापरले जाणारे यंत्र आहे. कापणीनंतर, धान्यांमध्ये अनेकदा उच्च आर्द्रता असते, ज्यामुळे साठवण दरम्यान धान्य खराब होऊ शकते. ग्रेन ड्रायर अतिरिक्त ओलावा काढून टाकण्यास, गुणवत्ता राखण्यास आणि क्षय रोखण्यास मदत करते.

धान्य ड्रायरचे प्रकार :बिन ड्रायर, टॉवर ड्रायर आणि कंटीन्यूएस ड्रायरसह विविध प्रकारचे धान्य ड्रायर आहेत. ते सामान्यतः गरम हवा किंवा उष्णता आणि वायू प्रवाह यांचे मिश्रण वापरतात, जेणेकरून धान्यातील ओलावा सामग्री साठवण्यासाठी सुरक्षित पातळीवर कमी होईल. या प्रक्रियेमध्ये धान्य ड्रायरमध्ये लोड करणे, त्यांच्याद्वारे गरम हवा फिरवणे आणि नंतर ओलावा असलेली हवा काढून टाकणे, इच्छित आर्द्रता पातळी प्राप्त होईपर्यंत चक्राची पुनरावृत्ती करणे समाविष्ट आहे. ग्रेन ड्रायर हे कृषी वातावरणात महत्त्वाचे आहेत, कारण ते शेतकर्यांना खराब होण्याच्या जोखमीशिवाय जास्त काळ धान्य साठवू देतात, त्यांच्या पिकांची उत्तम गुणवत्ता आणि बाजार मूल्य सुनिश्चित करतात.

स्ट्रॉबेरी लागवड पूर्ण माहिती

स्ट्रॉबेरीची लागवड ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर आणि कमी कालावधीत जास्त उत्पन्न देणारी शेती मानली जाते. जर तुम्ही स्ट्रॉबेरी लागवडीचा विचार करत असाल, तर खालीलप्रमाणे नियोजन करणे महत्त्वाचे ठरते:



हवामान आणि जमीन :हवामान: स्ट्रॉबेरीसाठी थंड आणि कोरडे हवामान अत्यंत योग्य असते. २०ओउ ते २५ओउ तापमान वाढीसाठी आणि १०ओउ ते १५ओउ तापमान फळधारणेसाठी उत्तम मानले जाते. जमीन: पाण्याचा उत्तम निचरा होणारी, हलकी ते मध्यम प्रकारची आणि सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध असलेली जमीन (कि ६.० ते ६.५) या पिकासाठी योग्य असते. लागवडीचा काळ आणि वाण :योग्य वेळ: महाराष्ट्रात सप्टेंबर ते ऑक्टोबर या काळात लागवड करणे सर्वात योग्य मानले जाते. प्रमुख वाण: स्वीट चार्ली, कॅमारोसा, विंटर डॉन, रानिया, नाबिला.

जमीन तयार करणे आणि गादीवाफे :जमीन २-३ वेळा उभ्या-आडव्या नांगरटीने भुसभुशीत करून घ्यावी आणि त्यात चांगले कुजलेले शेणखत (प्रति एकरी १०-१२ टन) मिसळावे. जमिनीचा प्रकार लक्षात घेऊन गादीवाफे तयार करावेत: रुंदी: २.५ ते ३ फूट. उंची: १ ते १.५ फूट. दोन वाफ्यांतील अंतर: १.५ ते २ फूट. ठिबक सिंचन आणि मल्चिंग :ठिबक सिंचन: प्रत्येक गादीवाफ्यावर २ लॅटरल (ठिबकच्या नळया) अंथराव्यात. मल्चिंग पेपर: लागवडीपूर्वी वाफ्यावर २५ ते ३० मायक्रॉनचा प्लास्टिक मल्चिंग पेपर (वरच्या बाजूने चांदीचा/काळा) टाकावा. फायदे: तणांचा प्रादुर्भाव रोखला जातो, जमिनीतील ओलावा टिकून राहतो आणि फळे मातीच्या संपर्कात न आल्याने कुजत नाहीत.

लागवड आणि अंतर :मल्चिंग पेपरवर ३० बाय ३० सेमी किंवा ३० बाय ४५ सेमी अंतरावर छिद्रे पाडून रोपांची लागवड करावी. प्रति एकर साधारणपणे २२,००० ते २५,००० रोपे लागतात. रोपांची लागवड ही संध्याकाळच्या वेळी किंवा ढगाळ वातावरणात करावी आणि लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे.

खत आणि पाणी व्यवस्थापन :पाणी: स्ट्रॉबेरीच्या पिकाला जास्त पाण्याची गरज नसते, पण जमिनीतील ओलावा सतत टिकून राहणे आवश्यक आहे. ठिबक सिंचनाचा वापर करून नियमित हलके पाणी द्यावे. खते: लागवडीच्या वेळी नत्र, स्फुरद आणि पालशची योग्य मात्रा द्यावी. फळधारणेच्या काळात विद्राव्य खतांचा (उदा. १९:१९:१९, ०:५२:३४, १३:०:४५) ठिबकद्वारे डोस द्यावा.

रोग व कीड नियंत्रण :कीड: मावा, तुडतुडे, कोळी (चळींशी) आणि अळी यांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. रोग: करपा, भुरी (झुवशी चळश्रवशु) आणि फळ कुजणे. उपाय: शेतात स्वच्छता ठेवावी आणि आवश्यकतेनुसार तज्ज्ञांच्या सल्ल्याने जैविक किंवा रासायनिक कीटकनाशकांची फवारणी करावी. काढणी आणि उत्पादन : लागवडीनंतर ४५ ते ६० दिवसांत फळे काढणीस तयार होतात. फळे पूर्ण लाल होण्यापूर्वी (साधारण ७०-८०% लाल झाल्यावर) देठासहित हळुवारपणे तोडावीत. उत्पादन: चांगल्या व्यवस्थापनाखाली प्रति एकर ८ ते १२ टन उत्पन्न मिळू शकते.

सर्पगंधाची लागवड करा आणि कमी खर्चात १ ते २ लाखांचा नफा मिळवा

सर्पगंधा ही वनस्पती वनौषधी झुडूप असून, साधारण ६० ते ९० सेंटिमीटरपर्यंत उंच वाढते.सर्पगंधा ही वनस्पती भारतात हिमालयातील सिमल्यापासून आसाम, त्रिपुरापर्यंत तसेच गंगेचे खोरे, बिहार, बंगाल, ओरिसा, नेपाळ, सिक्कीम. भूतान, अंदमान इत्यादी भागांतील जंगलांत आणि महाराष्ट्रात कोकण, पश्चिम घाट व विदर्भात आढळते.या वनस्पतीच्या खोडावरील साल पिवळसर असते. पाने साधी, लांबट आकाराची, तीन तीनच्या समूहात असतात. पानांचा रंग वरून गर्द हिरवा, तर खालून फिक्कट हिरवा असतो. मुळे सापासारखी लांब, जाड असून, मुळाची साल फिक्कट उदी रंगाची असते. फुलांचा रंग तांबडट-पांढरा असून फुलांचा गुच्छ शेंड्यावर किंवा पानांच्या बेचक्यात येतो. फुले लहान, पांढरी किंवा तांबडटसर असतात. फुलाचे डेखे लालभडक असतात. फळे वाटाण्याएवढी, काळसर जांभळ्या रंगाची असून, मांसल व कठीण कवचाची असतात. बिया, खोड व मुळापासून हिची लागवड करता येते.

सर्पगंधाचे उपयोग :सर्पगंधा वनस्पतीच्या मुहीळापासून अजमालाईन, सर्पेन्टाईन, रॉऊलफाईन, रेसरपीन ही महत्त्वाची अल्कलॉईड्ज मिळवली जातात. यापैकी रेसरपीन हा औषधगट रक्तदाब कमी करण्यासाठी वापरला जातो. नव्हस सिस्टमवर ही औषधे गुणकारी आहेत. वेडऱ्या, भ्रमिष्ट लोकांसाठी औषध म्हणून या वनस्पतीचा वापर होत असल्याने या वनस्पतीला 'पागल की दवा' असेही म्हणतात. तसेच मासिक पाळी वेळेवर व योग्य प्रमाणात येण्यास मुळांचा वापर करतात. सर्पदंश झाल्यास मुळाचा लेप जखमेवर लावतात. सर्पगंधेस जागतिक बाजारपेठेत भरपूर मागणी आहे. सर्पगंधापासून बनवलेल्या औषधांत या वनस्पतीच्या सुकवलेल्या मुळ्यांचा उपयोग होतो. मुळ्यांपासून



मिळवलेली अर्कद्रव्ये ही अपस्मार, चित्तविकृती, निद्रानाश, छिन्नमनस्कता आणि आंतड्यांच्या काही विकारांवर गुणकारी आहेत. पटकी, उदरशूल व ताप आदींवर सर्पगंधाच्या मुळांचा अर्क इतर वनस्पतींच्या अर्कांत मिसळून वापरतात. अर्भकाच्या जन्मावेळी मातेला वेणा येण्यासाठीही सर्पगंधा उपयोगी पडते. डोळ्यांच्या बुबुळावरील पारदर्शक पडदा अपारदर्शक होऊ लागल्यास सर्पगंधाच्या पानांच्या रसाचा उपाय करतात.

लागवड :सर्पगंधा च्या लागवडीचा कालावधी १८ ते २४ महिने तर तापमान जास्तीत जास्त ४० अंश सेल्सिअस पर्यंत चालते. यासाठी जमीन पाण्याचा निचरा होणारी तर चुनखडीचे प्रमाण कमी असावे लागते. या पिकाची लागवड ऑगस्ट ते सप्टेंबर महिन्यात करावी. दोन पद्धतीने याची लागवड करता येते.बियाणे - मे महिन्यात नर्सरी तयार करून घ्यावी एकरी चार किलो बियाणे घ्यावे एकरी ३५ ते ४० हजार रोपे तयार करावेत. ज्या क्षेत्रात नर्सरी तयार करायची आहे त्या क्षेत्रात दहा बाय दहा चे बेड तयार करून घ्यावेत. त्यावर शेणखत मिक्स करून त्यावर बियाणे पेरावे. अंदाजे २० ते ४० दिवसांच्या आत रोपांची उगवण व्हायला सुरुवात होते. त्यानंतर रोपांची लागवड ऑगस्ट सप्टेंबर महिन्यात शेतामध्ये करा. लागवड करताना दोन रोपांतील अंतर एक फूट किंवा दोन फूट इतके ठेवावे. मुळांपासून लागवड करणे - त्याकरिता या वनस्पतीची पाच सेंटीमीटर लांबी ची मुळे वापरावीत. त्याची लागवड जुलै महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या पावसाळ्यात करावी.

पाणी व्यवस्थापन :सर्पगंधा या औषधी वनस्पतीची लागवड करण्यासाठी सतत पाण्याची गरज नसते. त्यामुळे ड्रिप एरीकेशन चा वापर करावा. दर पंधरा दिवसांनी हवामानानुसार पाण्याचे व्यवस्थापन रोपांना करावे. ही गोष्ट लक्षात ठेवा की पावसाच्या पाण्याचा निचरा सहज गतीने त्या जमीनीतून झाला पाहिजे.

खत व्यवस्थापन : तसे पाहायला गेले तर औषधी वनस्पतींना विशेष अशा खतांची गरज नसते मात्र व्यावसायिकरित्या तुम्ही त्याची लागवड करत असाल तर मात्र प्रति एकरी नायट्रोजन ८ किलो, (युरिया १८ किलो) फॉस्फरस १२ किलो (सिंगल सुपर फॉस्फेट, ७५ किलो), १२ किलो (म्युरेट ऑफ पोटॅश २० किलो) टाकावे. त्यानंतर सर्पगंधा च्या वाढीच्या काळात आठ किलो नायट्रोजनची मात्रा द्यावी. तसेच शेतात जास्त पाणी झाल्यास किंवा पाण्यामुळे मुळांना बुरशी येऊ लागल्यास ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाचा वापर शेतकरी मित्रांनी करावा.

कीड आणि रोग व्यवस्थापन :या पिकावर पांढरी बुरशी पडते त्याकरिता फाईटोक्लोर किंवा मेरिस्टन ३%. तसेच पाने जाळल्यासारखी दिसल्यास डायथेन न ७८ फवारावे

काढणी :या पिकाची काढणी १८ महिन्यांनी केव्हाही करू शकता. काढणी करण्या अगोदर पाणी देऊन जमीन ओली करून घ्यावी. त्यानंतर रोपांची काढणी करावी. रोपांची काढणी केल्यानंतर मुळांचे १२ ते १५ सेंटिमीटर लांबीचे तुकडे करून वाळण्यास ठेवावेत. उत्पादन आणि बाजारभाव :सर्पगंधा या औषधी मुळाच्या सुकलेल्या उत्पादन आणि बाजारभाव बाबत माहिती घेऊया. सुकलेल्या मुळांचे सात ते नऊ क्विंटल उत्पादन होते. आणि त्यांचा बाजार भाव हा जवळपास १५० ते ३०० रुपये प्रति किलो इतका आहे. तसेच लागवडीपासून काढणीपर्यंत अंदाजे १० ते ३० किलोपर्यंत बियाणे देखील मिळते. अशाप्रकारे आपण सर्पगंधा या औषधी वनस्पतीचे लागवड करून एकरी १ ते २ लाख रुपये उत्पादन घेऊ शकतो.



महत्वाच्या घटना

१६८३ : छत्रपती संभाजी राजे यांच्या फौजेने फोंडा येथे अद्वितीय पराक्रम करून पोर्तुगिजांचा पराभव केला.

१७५५ भुकंप आणि सुनामीमुळे पोर्तुगालमधील लिस्बन शहर पूर्णपणे उद्ध्वस्त झाले तर सुमारे ६०,००० ते ९०,००० लोक ठार झाले.

१८७० : मेरिकेत हवामान विभागाने पहिला अधिकृत हवामान अंदाज सांगितला.

१८४५ : मुंबईत आधुनिक पाश्चात्य पद्धतीचे वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या आद्य ग्रँट मेडिकल कॉलेज या पहिल्या वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रारंभ झाला.

१८४८: महिलांसाठी पहिले वैद्यकीय महाविद्यालय बोस्ट, मॅसेच्युसेट्स, यूएसए येथे सुरू झाले. नंतर याचे बोस्टन विश्वविद्यालयात विलीनीकरण झाले.

१८९६ : नॅशनल जिओग्राफिक मॅगझिनमध्ये पहिल्यांदाच नग्न चित्र प्रकाशित झाले.

१९२५ : गोविंदराव देशमुखांच्या अध्यक्षतेखाली मध्यप्रांत वऱ्हाडातील स्वराज्य पक्षाच्या तिन्ही प्रांतिक समित्यांची एक अनौपचारिक संयुक्त बैठक झाली.

१९२८ : हिंदुस्थान सरकारने आपल्याला हवे तसे बदल विधेयकात करून त्याचे कायद्यात रुपांतर केले आणि नवी महसूल संहिता वऱ्हाडात लागू करण्यात आली.

१९४५ : ऑस्ट्रेलियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.

१९५६ : भारतामध्ये भाषावार प्रांतरचना अस्तित्त्वात आली.

१९५६ : आंध्र प्रदेश राज्याची निर्मिती झाली. त्यावेळी कुर्नुल ही त्याची राजधानी होती.

१९५६ : दक्षिण भारतातील कन्नड भाषिक प्रदेश एकत्र करुन कर्नाटक राज्याची स्थापना करण्यात आली.

१९५६ : केरळ राज्य स्थापना दिन.

१९५६ : कन्याकुमारी जिल्हा केरळ मधुन तामिळनाडूमध्ये हस्तांतरित करण्यात आला.

१९६६ : पंजाब राज्याची पंजाब व हरियाणा राज्यात विभागणी झाली.

१९६८ : मोशन पिक्चर असोसिएशन ऑफ अमेरिकाच्या फिल्म रेटिंग सिस्टीमची अधिकृतपणे सुरवात झाली.

१९७३ : मैसूर राज्याचे नाव बदलुन ते कर्नाटक असे करण्यात आले.

१९७३ : लखदीप, मिनिकॉय, अग्रिदीव बेटांचे नांव लक्षद्वीप असे ठेवण्यात आले.

१९८२ : अमेरिकेत मोटारगाड्यांचे उत्पादन करणारी होंडा ही पहिली आशियाई कंपनी बनली.

१९९३ : औपचारिकपणे युरोपियन युनियन स्थापन झाले.

१९९४ : मराठी चित्रपटसृष्टीतील विशेष कामगिरीचा गौरव म्हणून चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व लेखक दिनकर द. पाटील यांची चित्रभूषण पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

१९९९ : कवी नारायण सुर्वे यांना मध्यप्रदेश सरकारचा कबीर पुरस्कार हा मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला.

२००० : सर्बियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.

२००५ : योगेशकुमार सभरवाल यांनी भारताचे वे३६ सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.

१९५६ : द्विभाषिक मुंबई राज्याची निर्मिती

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८८ : चित्रकार, नेपथ्यकार, रंगभूमिविषयक ग्रंथांचे लेखक पुरुषोत्तम श्रीपत काळे यांचा जन्म.

१८९३ : शीख धर्माचा समग्र इतिहास लिहिणारे आधुनिक बंगाली इतिहासकार इंदुभूषण बॅनर्जी यांचा जन्म. (मृत्यू: १३ नोव्हेंबर १९५६ कोलकता, पश्चिम बंगाल)

१९१८ : विनोदी अभिनेते शरद गणेश तळवळकर यांचा जन्म. (मृत्यू: २१ ऑगस्ट २००१)

१९२६ : संगीत दिग्दर्शक कवी रेडिओ वरील सुगम संगीत विभाग प्रमुख, शब्द प्रधान गायकी चे लेखक यशवंत देव यांचा पेण येथे जन्म.

१९३२ : कवी अरुण बाळकृष्ण कोलटकर यांचा कोल्हापूर येथे जन्म.

१९४० : भारताचे वे३५ सरन्यायाधीश रमेश चंद्र लाहोटी यांचा जन्म.

१९४५ : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक नरेंद्र दाभोलकर यांचा जन्म. (मृत्यू: २० ऑगस्ट २०१३)

१९६० : अपल इन्कचे सध्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी टीम कूक यांचा जन्म.

१९६३ : भारतीय उद्योजीका नीता अंबानी यांचा जन्म.

१९७३ : अभिनेत्री ऐश्वर्या राय यांचा जन्म.

१९७४ : क्रिकेटपटू वी. वी. एस. लक्ष्मण यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७३ : बंगाली नाटककार दीनबंधू मित्र यांचे निधन.

१९५० : जागतिक ख्यातीचे बंगाली साहित्यिक बितीभूषण बंदोपाध्याय यांचे निधन. (जन्म: १२ सप्टेंबर १८९४)

१९८८ : ज्येष्ठ राष्ट्रीय कीर्तनकार गोविंदस्वामी आफळे यांचे पुणे येथे निधन.

१९९१ : संगीतकार व संगीत संयोजक अरुण पौडवाल यांचे निधन.

१९९३ : ठुमरी, दादरा व गझल गायिका नैनोदेवी यांचे निधन.

१९९४ : शेती आणि पाणी विषयाचे तज्ञ, कामगार नेते कॉम्रेड दत्ता देशमुख यांचे निधन.

१९९६ : श्रीलंकेचे दुसरे राष्ट्राध्यक्ष ज्युनिअस जयवर्धने यांचे निधन. (जन्म: १७ सप्टेंबर १९०६)

२००५ : लेखिका योगिनी जोगळेकर यांचे निधन. (जन्म: ६ ऑगस्ट १९२५)

२००७ : भारतीय दिग्दर्शक आणि पटकथा लेखक एस. अली रझा यांचे निधन.

पिंपळदरीत तूर पिकावर दुष्काळाचे सावट

पाऊस नसल्याने यंदा खरिपामधील उत्पादनात मोठी घट येण्याची शक्यता

पिंपळदरी । प्रतिनिधी

भूजलपातळी कमालीची खालावल्याने आणि अनुकूल हवामानाच्या अभावामुळे पिंपळदरी परिसरातील शेतातील पिके सुकण्याच्या मार्गावर लागली आहेत. त्यामुळे स्थानिक बळीराजाची चिंता प्रचंड वाढली आहे. यंदाच्या मान्सून हंगामात झालेला अत्यल्प पाऊस, वेगाने खालावलेली भूजलपातळी आणि ऑक्टोबर महिना संपत आला तरीही थंडीचा असलेला अभाव अशा तिहेरी प्रतिकूल परिस्थितीचा भीषण फटका आता तूर पिकाला बसू लागला आहे.



यंदा वेळेवर व पुरेसा पाऊस न झाल्याने आधीच मका, सोयाबीन, कपाशी आदी मुख्य पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यापाठोपाठ आता हातातोंडाशी आलेले तुरीचे पीकही पूर्णपणे धोक्यात आले आहे. तीव्र पाण्याची टंचाई आणि थंडीचा अभाव यामुळे तुरीच्या नैसर्गिक वाढीवर विपरीत परिणाम होत असून शेतातील पीक वाळून सुकू लागल्याचे विदारक चित्र ठिकठिकाणी पाहायला मिळत आहे. त्यामुळे चालू हंगामात संपूर्ण जिल्ह्यात तुरीच्या एकूण उत्पादनात मोठी घट होण्याची दाट शक्यता कृषी वर्तुळातून व्यक्त केली जात आहे. सध्याच्या काळात तूर पिकाला पाण्याची सर्वाधिक गरज असते. परंतु याच निर्णायक परिस्थितीत जमिनीत ओलावा नसल्याने तूर सुकण्याच्या मार्गावर असून, यामुळे परिसरातील हजारो शेतकरी पुन्हा एकदा मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. पावसाने दिलेली ओढ आणि भूजलपातळीत झपाट्याने झालेली घसरण यांमुळे शेतात उभ्या असलेल्या तूर पिकाला पाण्याचा प्रचंड ताण जाणवत आहे. त्यातच तुरीसाठी आवश्यक असणारी थंडी अजूनही सुरू न झाल्याने पिकांच्या वाढीवर आणि प्रक्रियेवर मोठा परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे. पाण्याअभावी उभी पिके डोळ्यांदेखत सुकत असल्याने बळीराजाचे संपूर्ण आर्थिक गणितच कोलमडून पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यंदाच्या हंगामात चांगले उत्पादन मिळेल या आशेने शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात तूर पिकाची लागवड केली होती. तुरीच्या पिकाला थंडीचा अभाव ठरणार घातक ऑक्टोबर महिना संपत आला तरी हवामानात अपेक्षित थंडी जाणवत नाही. तुरीच्या वाढीच्या आणि फुलोऱ्याच्या महत्त्वाच्या काळात तापमानातील हा प्रतिकूल बदल अत्यंत घातक ठरू शकतो. पाणीटंचाई आणि हे विषम हवामान असेच कायम राहिल्यास तुरीच्या उत्पादनात कमालीची घट होईल. अल्प पावसामुळे बहुतांश भागातील विहिरींनी तळ गाठला आहे. त्यातच एल निनोचा संभाव्य प्रभाव आणि दुष्काळसदृश परिस्थिती यामुळे ग्रामीण भागात भीतीचे वातावरण आहे.

ऊसतोड कामगारांच्या वारसांना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते धनादेश वितरित



जालना। प्रतिनिधी

ऊसतोड कामगारांना सामाजिक सुरक्षा व आर्थिक आधार मिळावा, तसेच कामगारांच्या कुटुंबीयांना संकटाच्या काळात मदत व्हावी, या उद्देशाने लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळामार्फत आर्थिक सहाय्य योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत अपघाती मृत्यू झालेल्या ऊसतोड कामगारांच्या वारसांना पाच लाख रुपये, तर बैलजोडीच्या मृत्यूच्या प्रकरणात संबंधित कामगारांना ५० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात येते.

या योजनेंतर्गत मंजूर झालेल्या अर्थसहाय्याचे धनादेश दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. अपघाती मृत्यू झालेल्या ऊसतोड कामगारांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाख रुपयांचे धनादेश, तर बैलजोडीच्या मृत्यूच्या प्रकरणात संबंधित ऊसतोड कामगारांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे धनादेश देण्यात आले.यावेळी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण डॉ. अनिता राठोड, विशेष अधिकारी (शासकीय) स्नेहल मोदाळे आदी उपस्थित होते. सहाय्यक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी लाभार्थी वारसांचे सांत्वन करून शासन त्यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले.

लातूरमध्ये कुरिअरच्या वाहनात भीषण स्फोट

१ कर्मचारी गंभीर, पार्सलमध्ये बंदूक आढळल्याने पोलीस अलर्ट मोडवर

लातूर। प्रतिनिधी

लातूर येथील उद्योग भवन परिसरातील 'उमाटे कुरिअर सर्व्हिस'च्या कार्यालयासमोर पार्सल उतरवताना एका टेम्पोमध्ये अचानक भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत पार्सल खाली उतरवणारा १ कर्मचारी गंभीर रित्या जखमी झाला असून त्याच्यावर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, रोजच्याप्रमाणे कुरिअर वाहनातून सामानाची चढ-उतार करण्याचे काम सुरू असताना एका पार्सलचा जोरदार स्फोट झाला. हा स्फोट इतका तीव्र होता की टेम्पोचे छत आणि काचा उडून वाहनाचे प्रचंड नुकसान झाले, तसेच परिसरातील इतर साहित्याचीही नासधूस झाली. स्फोटाच्या आवाजाने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.



घटनेची माहिती मिळताच लातूर पोलीस, श्वान पथक आणि फॉरेन्सिक टीमने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. अतिरिक्त पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनीही घटनास्थळाची पाहणी केली. तपासादरम्यान संबंधित वाहनात एक बंदूक आढळून आल्याने सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाल्या आहेत.हा स्फोट कशामुळे झाला, पार्सलमध्ये ज्वलनशील अथवा स्फोटक पदार्थ होते का, आणि ते नेमके कोणी व कुठून पाठवले होते, याचा शोध पोलीस घेत आहेत. या पार्सलबाबत कुरिअर कंपनीला पूर्वकल्पना होती का, या दृष्टीने कर्मचाऱ्यांची चौकशी सुरू आहे.दरम्यान, ''आमच्याकडे येणाऱ्या पार्सलमध्ये नेमके काय साहित्य आहे याची माहिती नसते, तर येथून बाहेर जाणाऱ्या पार्सलची नोंद असते,'' असे स्पष्टीकरण कुरिअर सर्व्हिसच्या संचालकांनी दिले आहे. सध्या पोलीस आणि फॉरेन्सिक पथक या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

छत्रपती संभाजी येथील भारतीय योग साधकांची बीड शाखेला सदिच्छा भेट

संभाजीनगर । प्रतिनिधी

भारतीय योग संस्थान दिल्ली संचलित आज दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी सात वाजता छत्रपती संभाजीनगर येथील वरिष्ठ योग साधकांनी सदिच्छा भेट देऊन उपस्थित योग साधकांना आपल्या अमूल्य वाणीतून योग साधना विषयी सविस्तर अशी माहिती देऊन येथील चालू असलेल्या योग वर्गाला मार्गदर्शन केले. दररोज नेहमीपेक्षा युव व प्राणायाम करण्यापेक्षा त्याच्यामध्ये कशी विविधता आणता येईल व प्राणायामची योग करून यामध्ये एकाग्रता वाढवली पाहिजे तसेच या योग वर्गाच्या बाबतीत दररोज सातत्य प्रत्येकामध्ये असल्यामुळे समाधान व्यक्त केले.



तसेच युवा पिढीला आपल्या योग साधनेत कसे आणता येईल याची सुद्धा संकल्पना मांडली तसेच शंख प्रक्षण या योग साधना प्रत्येकाने करायलाच पाहिजे व आपली शरीर शुद्धीकरण करून आपल्या आरोग्य कसे तंदुरुस्त राहील याकडे प्रत्येकाने लक्ष दिले पाहिजे या कार्यक्रमातच स्थानिक श्रीमान बाबुराव शिंदे अण्णा माजी सैनिक, मोटे,भालचंद्र तकिक माजी सरपंच उंब्रज जहांगीर, शंकर आप्पा सरडे जाधव आर्दीनी श्री व श्रीमती वर्षा दिनेश देशपांडे, सुरेश डहाके शंकर किनगे संजय औरंगाबादकर यांचे स्वागत केले. आपल्या युग साधनेच्या वर्गामध्ये जे सातत्य ठेवले यापेक्षा आणखीन वर्गांची योग संख्या कशी वाढवता येईल यांच्यामध्ये भर दिला पाहिजे असे अपेक्षित केले. योग साधना ही ऋषीमुनी पुसून आलेली परंपरा असून मध्ये अपेक्षित आरोग्य तंदुस्त आरोग्याच्या दृष्टीने परश्या प्रेशर मधील किरकोळ व दीर्घ व्याधीचे आजार नष्ट करून आपली शरीर कांती तेजस्वी करता येते व आपले दैनंदिन जीवन अत्यंत सुखा समाधानाने जीवन जगता येते हे प्रत्येकाने विसरता कामा नये दररोजचा पेक्षा आजचा योग वर्ग मोठ्या उत्सव आनंदाचा झाला व आणखीन या निमित्ताने दुर्मिळ अशी योग साधने बाबतची माहिती एकंदरीत ज्ञानात भर पडली. या योग वर्गात राजेंद्र सुरवसे सवाशेर ठाकूर मदन काबरा जाधव मोटे, यांच्यासह इतरही योग्य प्रेमी उपस्थित होते.

सरदार वल्लभभाई पटेलांच्या मुत्सद्दीपणामुळेच अखंड भारत साकारला- चंदनशिवे

लोहारा। प्रतिनिधी

भारताचे पहिले उपपंतप्रधान, गृहमंत्री आणि लोहपुरुष भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती जिजाऊ मेमोरियल प्रशासकीय सेवा महाविद्यालयात ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी उपस्थितांनी सरदार पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.कार्यक्रमात विद्यार्थ्यांना संबोधित करताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य यशवंत चंदनशिवे यांनी सरदार पटेल यांच्या ऐतिहासिक योगदानाचा आढावा घेतला. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सरदार पटेल यांनी भारताचे पहिले गृहमंत्री म्हणून देशाच्या एकत्रीकरणाचे अभूतपूर्व काम केले, असे त्यांनी सांगितले. देशातील ५६० संस्थानांपैकी बहुतांश संस्थाने त्यांनी साम, दाम आणि दंडाचा वापर करून भारतात विलीन केली.

हैदराबादचा निजाम, जुनागढ आणि काश्मीर या ३ संस्थानांनी सुरुवातीला प्रतिसाद दिला नव्हता. मात्र, पटेल यांच्या कुशल नेतृत्वाखाली सैनिकी कारवाई (पोलीस ॲक्शन) करून ही संस्थाने भारतात विलीन करून घेण्यात आली. हैदराबाद मुक्ती संग्रामात निजामचा सेनापती कासीम रिझवी आणि त्याच्या रझाकार संघटनेकडून मराठवाड्यातील सामान्य जनतेवर होणारे अत्याचार मोडून काढण्यात सरदार पटेल यांची भूमिका निर्णायक ठरली.स्वामी रामानंद तीर्थ आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या मुत्सद्दीपणामुळेच आजचा मराठवाडा सुरक्षित व स्वतंत्र रूपात पाहायला मिळत आहे,

महामार्गाच्या भूसंपादनाचा मोबदला स्वीकारण्यास शेतकऱ्यांचा नकार

सूरत-चेन्नई महामार्गाचे राहुरी तालुक्यातील भूसंपादन बाधित शेतकरी आक्रमक

श्रीरामपूर। प्रतिनिधी

कुंभमेळ्यासाठी कोट्यवधी रुपये द्यायला सरकारकडे पैसे आहेत. इकडे शेतकऱ्यांचे घरदार उद्ध्वस्त करताना कवडीमोल भाव दिला जात असल्याचा संताप महामार्ग संघर्ष समितीचे प्रमुख लक्ष्मण अंत्रे यांनी व्यक्त करत शेतकऱ्यांनी भूसंपादनाची रक्कम नाकारली आहे. श्रीरामपूरच्या प्रांत कार्यालयात राहुरी तालुक्यातील सोनगाव येथील शेतकऱ्यांना जमिनीच्या नुकसानभरपाईचे वाटप करण्यात येणार होते. शेतकऱ्यांनी ते नाकारले. या महामार्गासंदर्भात नोव्हेंबर २०२१ मध्ये राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरणाने नोटिफिकेशन काढले होते. त्यानंतर शेतकऱ्यांच्या जमिनीचे तसेच घरे, गोठा, शेड, विहीर, फळबागा यांचे मूल्यांकन कृषी, महसूल, बांधकाम, वनविभागाने



केले.

प्रांतांनी नियमानुसार या मूल्यांकनाची तपासणी केली. यात दोन वर्षे गेली. त्यानंतर २०२४ मध्ये भारतमाला योजना बंद झाल्यामुळे हा प्रकल्प थांबविण्यात आला. शेतकऱ्यांच्या जमिनीवर एनएचआयचा फेर पडल्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज मिळणे मुश्कील झाले. प्रकल्प रखडल्याने जमिनीची खरेदी-विक्री करता येईना. २०२५ च्या शेवटी प्रकल्पाला पुन्हा गती मिळाली. २०२६ मध्ये महामार्गासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू झाली. परंतु एनएचआयने आधी शेतकऱ्यांना केवळ जमिनीचे पैसे देण्याचे ठरवले. जमिनीवरील ॲसेटसचे पैसे पुन्हा तपासणी करून देऊ, असे कारण सांगितले. ते शेतकऱ्यांना मान्य नाही. याचा निषेध करण्यासाठी शेतकऱ्यांनी काल प्रांत कार्यालयात येत प्रांताधिकारी किरण सावंत यांना निवेदन दिले. सोनगावसह सात्रळ, कानडगाव, कनगर, वांबोरी आदी गावांतील शेकडो शेतकरी उपस्थित होते.

हुंड्यासाठी छळ, उपचारांकडे दुर्लक्ष; विवाहितेचा मृत्य

शेवगाव। प्रतिनिधी

हुंड्यासाठी सतत शारीरिक व मानसिक छळ आणि गंभीर आजारपणात वेळेवर उपचार न मिळाल्याने विवाहितेचा पुण्यातील केईएम रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पती अल्ताफ शेख याच्यासह सासरच्या नऊ जणांविरोधात मृत विवाहितेच्या माहेरच्या नातेवाईकांनी अहिल्यानगर पोलीस अधीक्षकांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, विवाहावेळी माहेरच्या मंडळींनी सुमारे दहा लाख रुपये खर्च केले होते. मात्र, लग्नानंतर सासरच्या मंडळींकडून आणखी पैशांची मागणी सुरू झाली. किराणा मालासारख्या जीवनावश्यक गरजांकडे दुर्लक्ष करणे, उपाशी ठेवणे, शिवीगाळ आणि मारहाण करून तिचा छळ करण्यात येत असल्याचा आरोप आहे. विवाहितेला दाढदुखी आणि अतिरक्तस्रावाचा त्रास सुरू असतानाही सासरच्यांनी उपचारांकडे दुर्लक्ष केले. उपचारांसाठी माहेरून पैसे आणण्याचा तगादा लावल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. प्रकृती गंभीर झाल्यानंतर तिला माहेरी सोडण्यात आले. नातेवाईकांनी तिला पुण्यातील केईएम रुग्णालयात दाखल केले; मात्र १९ ऑगस्ट रोजी उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. मुलीचा मृत्यू हा छळ आणि वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे झाल्याचा आरोप तिच्या आईने केला आहे. संबंधितांविरोधात तातडीने गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी माहेरच्या नातेवाईकांनी केली आहे.

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, जावेदखान पि. मदरखान पठाण रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड यांनी दिलेल्या कागदपत्रावरून जाहीर प्रगटन देण्यात येते की, मी मिर्झा सादेक लियाकत बेग रा. माळापुरी ता. जि. बीड यांच्याकडून मौजे पारगांव जप्ती ता.जि. बीड येथील त्यांचे मालकी व ताब्यातील जमीन गट नंबर ४५ एकूण क्षेत्र १२ हे. ०० आर. पैकी विक्री क्षेत्र ०१ हे. ०२ आर. जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचा ठराव केलेला आहे. सदर जमिनीची चतुःसीमा खालील प्रमाणे आहे.

पूर्वेस-मिर्झा आजम दौलत बेग, पश्चिमेस-गणेश, नारायण, संजय पि. दामोदर बहिर, दक्षिणेस-हिंगणी ते बीड रोड, उत्तरेस-मिर्झा हाशम बेग

वरील चतुःसीमेच्या आतील ०१ हे. ०२ आर. जमीन मी म्हणजे मिर्झा सादेक लियाकत बेग रा. माळापुरी ता. जि. बीड , जावेदखान मदारखान पठाण रा. गेवराई यांच्याकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचा ठराव केलेला आहे. म्हणून या जाहीर प्रगटनाद्वारे तमाम जनतेस सूचित करण्यात येते की, वरील जमिनीच्या व्यवहाराबाबत कोणालाही कसल्याही प्रकारचा आक्षेप किंवा हरकत असेल तर त्यांनी १५ दिवसाचे आत वरील नमूद जमिनीच्या कागदपत्रासह अथवा इतर पुराव्यासह मला भेटावे व आक्षेप नोंदवावा कळवावे, नसता १५ दिवसानंतर सदर जमिनीबाबत कोणाचाही काहीही आक्षेप नाही असे गृहीत धरून सदर जमिनीचे रजि. खरेदीखत करण्यात येईल करिता सदरचे जाहीर प्रगटन.

जाहीर प्रगटन देणार
स्वाक्षरीत /-
दिनांक ३१/१०/२०२६
मिर्झा सादेक लियाकत बेग रा.
माळापुरी ता. जि. बीड ,
मो. ७० २० ४८ ५१ ९८

दुष्काळी जालन्यामध्ये ड्रोनद्वारे पाऊस पाडण्याची चाचपणी

४०० मीटर उंचीवरून ढगांमध्ये क्षार-आधारित सीडिंग द्रव्याची फवारणी

जालना। प्रतिनिधी

जालन्यात स्वदेशी ड्रोन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कृत्रिम पाऊस पाडण्याच्या तंत्राची चाचपणी सुरू झाली आहे. त्याचाच एक भाग म्हणून जालना शहराजवळील इस्लामवाडी येथील टेकडीवरून ड्रोनच्या साहाय्याने क्लाउड सीडिंगची प्रायोगिक चाचणी घेण्यात आली. सुमारे ४०० मीटर उंचीवरून ढगांमध्ये क्षार-आधारित सीडिंग द्रव्याची फवारणी करण्यात आली. जालन्यात स्वदेशी ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करून प्रथमच असा प्रयोग करण्यात आला.या प्रात्यक्षिकावेळी प्रद्युम्न मानधानी, डॉ. बळीराम बागल आदी उपस्थित होते. पारंपरिक विमानांच्या तुलनेत ड्रोनच्या माध्यमातून कमी खर्चात, विशिष्ट ठिकाणी आणि गरजेनुसार सीडिंग करता येऊ शकते का, याची पडताळणी या प्रयोगातून करण्यात आली. विशेष म्हणजे, पुण्यातील भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्थेने (आयआयटीएम) सोलापूरच्या दुष्काळी पट्ट्यात क्लाउड सीडिंगवर संशोधन केले आहे. या प्रयोगांमध्ये योग्य वातावरणीय परिस्थितीत पर्जन्यमानात वाढ होण्याचे निष्कर्ष नोंदवण्यात आले आहेत. त्यामुळे



जालन्यातील या प्रयोगालाही भविष्यात महत्त्व प्राप्त होऊ शकते.

जालन्यात राबवलेला हा उपक्रम सध्या प्रायोगिक स्वरूपाचा आहे. ड्रोनद्वारे सीडिंगचे द्रव्य योग्य उंचीवर आणि योग्य ढगांपर्यंत पोहोचवता येते का, याचा अभ्यास केला जाणार आहे. फवारणीची यंत्रणा किती परिणामकारक आहे याचाही अभ्यास होणार आहे. हवामानानुसार त्याचे परिणाम कसे बदलतात याचे निरीक्षण केले जाणार आहे. सीडिंग केलेल्या ढगांची आणि सीडिंग न केलेल्या ढगांची तुलना करण्यात येईल. इतर निरीक्षणे घेतली जातील. क्लाउड सीडिंग म्हणजे ढगांमध्ये कृत्रिमरीत्या सूक्ष्म कण सोडून पावसाच्या निर्मितीच्या नैसर्गिक प्रक्रियेला चालना देणे. यामध्ये प्रामुख्याने दोन पद्धती वापरल्या जातात. हायग्रोस्कोपिक सीडिंगमध्ये मिठासारखे पाणी आकर्षित करणारे कण उबदार ढगांमध्ये सोडले जातात. त्यांच्याभोवती सूक्ष्म पाण्याचे थेंब एकत्र येतात. ते मोठे होतात. थेंब पुरेसे जड झाल्यानंतर पाऊस पडू शकतो. ग्लेशिओजेनिक सीडिंग पद्धतीत अतिथंड ढगांमध्ये सिल्व्हर आयोडाइडसारखे कण सोडले जातात. ते बर्फाच्या स्फटिकांच्या निर्मितीस चालना देतात. हे स्फटिक वाढतात. ते वितळल्यास पावसाचे थेंब तयार होऊ शकतात.

बिडकीन खून प्रकरण:तरुणाला खोट्या गुन्ह्यात गोवण्याचा पोलिसांचा प्रयत्न

कोर्टाचे तपास अधिकाऱ्यावर कडक ताशेरे, दोषारोपपत्र रद्द

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

बिडकीन येथे बॅनर लावण्याच्या वादावरून झालेल्या खुनात एका तरुणाला खोट्या गुन्हात गोवण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला. या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने तपास अधिकाऱ्यावर कडक शब्दांत ताशेरे ओढले. सोबतच संबंधित दोषारोपही रद्द केले. त्यामुळे पोलिसांची चांगलीच नाचक्की झाली. बॅनर लावायला सांगणे हे खुनाच्या गुन्ह्यास प्रवृत्त करणे ठरत नाही, आरोपीला खोट्या गुन्हात गोवण्याच्या उद्देशाने तपास अधिकाऱ्याने विलंबाने साक्षीदारांचे जबाब नोंदवल्याचे सांगत न्यायालयाने पोलीस तपासातील दुर्भावनेवर गंभीर ताशेरे ओढले.

दिनांक २३ ऑक्टोबर २०२५ रोजी बिडकीन येथे दिवाळीच्या शुभेच्छा फलकाजवळ वाढदिवसाचा बॅनर लावण्यावरून दोन गटांत झालेल्या हिंसक संघर्षात एका तरुणाचा जीव गेला होता. याप्रकरणी योगेश मारोती दाने यांच्या तक्रारीवरून बिडकीन पोलीस ठाण्यात ५ नामनिर्देशित आणि इतर ३० ते ३५ अनोळखी व्यक्तींवर दंगा व खुनाचा गुन्हा नोंदवला गेला होता. तपास यंत्रणेने केवळ बॅनर लावण्यास प्रोत्साहित केल्याचा ठपका ठेवत आकाश अशोक वंजारे आणि वामन साठे यांना या प्रकरणात सहआरोपी केले व पैठण सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या कारवाईविरोधात आकाश वंजारे याने ॲड. संदीप बी. राजेभोसले यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाद मागणारा अर्ज दाखल केला होता.

दैनिक
राज्य लोकतंत्र
रविवार दि.०१ नोव्हेंबर २०२६ | ६

पाटोद्याच्या ज्येष्ठ नागरिकाच्या मदतीला ना. पंकजाताई मुंडे धावल्या

गंभीर हृदयशस्त्रक्रियेसाठी मंजूर करून दिली १० लाखांची मदत ! शासनाच्या जीवनदायी कार्यालयाच्या वैद्यकीय राखीव निधीतून मिळाला आर्थिक हातभार

पाटोदा । प्रतिनिधी

शेकडो गरजू रूग्णांना नेहमीच उपचारासाठी वैद्यकीय मदत मिळवून देणाऱ्या राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील ७७ वर्षाच्या ज्येष्ठ नागरिकाच्या मदतीलाही धावून आल्या. काकासाहेब आश्रुबा शेलार यांच्या गंभीर हृदयविकारावरील उपचारांसाठी जीवनदायी योजनेतून त्यांनी १० लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर करून दिली. शेलार कुटुंबियांनी याबद्दल त्यांचे व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

दासखेड येथील रहिवासी असलेले काकासाहेब शेलार (वय ७७) यांच्यावर २०१४ मध्ये हृदयाच्या झडपेची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. मात्र, सध्या पुन्हा हृदयाच्या झडपेचा गंभीर त्रास उद्भवल्याने त्यांच्यावर ढीरपीलरींहशींशी चळींरश्र तरश्रींश खाश्रिरपींरींळेप (ढचतख) ही अत्याधुनिक प्रक्रिया करण्याचे डॉक्टरांनी सांगितले होते, या उपचारासाठी सुमारे १० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित होता.

आर्थिक परिस्थिती आणि उपचारांचा मोठा खर्च लक्षात घेता कुटुंबीयांनी शासनाच्या वैद्यकीय राखीव निधीतून मदत मिळावी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. मात्र, मंजुरी प्रक्रियेला विलंब होत असल्याने कुटुंबीय चिंतेत होते.

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ मदत



करण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले, एवढेच नव्हे तर याबाबत वेळोवेळी माहिती घेतली. मुख्यमंत्री सहायता कक्षाच्या अधिकाऱ्यांनीही या प्रकरणात लक्ष घालून आवश्यक कार्यवाहीसाठी प्रयत्न केले. अखेर १० लाख रुपयांच्या आर्थिक मदतीला मंजुरी मिळाली.

लवकरच होणार हृदयशस्त्रक्रिया

रुग्णासाठी आवश्यक असलेली हृदयाची झडप तयार करण्यासाठी रुग्णालय प्रशासनाने संबंधित कंपनीला आदेश दिले आहेत. झडप उपलब्ध होताच पुढील वैद्यकीय प्रक्रिया पूर्ण करून लवकरच शस्त्रक्रिया करण्यात येईल, अशी माहिती संबंधित विभागातील डॉक्टरांनी दिली आहे.

मुलाने मानले मंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासह सर्वांचे आभार

वडिलांच्या उपचारांसाठी आर्थिक मदत मंजूर झाल्याने मुलगा हरिदास शेलार यांनी मंत्री पंकजाताई मुंडे, मुख्यमंत्री सहायता कक्षाचे अधिकारी, संबंधित वैद्यकीय अधिकारी आणि या प्रकरणात सहकार्य करणाऱ्या मराठी पत्रकार परिषदेसह सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. माझ्या वडिलांच्या उपचारांसाठी शासनाकडून १० लाख रुपयांची मदत मंजूर झाली, ही आमच्या कुटुंबासाठी मोठी दिलासादायक बाब आहे. या कठीण प्रसंगी मंत्री पंकजाताई मुंडे, मुख्यमंत्री सहायता कक्षाचे अधिकारी आणि मराठी पत्रकार परिषदेने केलेल्या सहकार्याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे, अशी भावना हरिदास शेलार यांनी व्यक्त केली.

बंडू भाऊ कदम यांच्या वाढदिवसा-निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

सामाजिक बांधिलकी आणि समाजोपयोगी उपक्रमांची परंपरा जपत अंकुश उर्फ बंडू भाऊ कदम यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. २ नोव्हेंबर २०२६ रोजी हे शिबिर ज्योती कॉम्प्लेक्स, बीड येथे संपन्न होणार आहे.



वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून गरजू रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी आपल्या आनंदाचा वाटा समाजाला देण्याचा संकल्प या उपक्रमातून करण्यात आला आहे. 'रक्तदान करा... जीवनदान द्या' हा संदेश देत या सामाजिक उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. दिनांक: २ नोव्हेंबर २०२६ सकाळी १०:०० ते दुपारी ३:०० वाजेपर्यंत ज्योती कॉम्प्लेक्स, बीड रक्तदान हे श्रेष्ठ दान असून यामुळे अनेकांना नवीन जीवन मिळते. बंडू कदम यांनी आजपर्यंत अनेकांना मदत करून सामाजिक बांधिलकी जपली आहेया सामाजिक कार्यात सहभागी होऊन इतरांच्या जीवनात आशेचा किरण बनावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने मित्रपरिवार, नागरिक आणि रक्तदात्यांना करण्यात आले आहे.

तिर्थपुरीतील आंतरजिल्हा टोळीच्या बीड एलसीबीने मुसक्या आवळल्या

९ लाखांचा मुद्देमाल जप्त, ४ गुन्हे उघड

बीड । प्रतिनिधी

नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या घरफोडीचा छडा लावत स्थानिक गुन्हे शाखेने जालना जिल्ह्यातील तिर्थपुरी येथील आंतरजिल्हा सराईत गुन्हेगारांच्या टोळीला जेरबंद केले आहे. पोलिसांनी चार आरोपींना अटक करून त्यांच्या ताब्यातून तब्बल ९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, घरफोडी व वाहन चोरीचे एकूण ४ गंभीर गुन्हे उघडकीस आणले आहेत.

नेकनूर पोलीस ठाण्यात दाखल गु.र.नं. ४४१/२०२६ (कलम ३०५, ३३१(४) चा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा व नेकनूर पोलिसांकडून सुरू होता. तपासादरम्यान पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची कसून तपासणी केली. सीसीटीव्हीमध्ये कैद झालेल्या संशयितांचा पेहराव व हालचालींवरून, तसेच तांत्रिक



विश्लेषण आणि गोपनीय बातमीदारांच्या मदतीने या गुन्ह्यातील आरोपींची ओळख पटवण्यात आली. या टोळीमध्ये बालसिंग अमलरसिंग टाक (वय ३०), नानकसिंग मगबलसिंग बावरी (वय २२), अरूणसिंग जगतापसिंग बावरी (वय २०, तिघे रा. संभाजीनगर, तिर्थपुरी, ता. घनसांगवी, जि. जालना) आणि इरफान बनिमियाँ सय्यद (वय २०, रा. रूई, ता. अंबड, जि. जालना) यांचा समावेश असल्याचे निष्पन्न झाले.

गेवराई बायपासवर सापळा रचून कारवाई

गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, हे चोरटे इरफान सय्यद याच्याकडील लाल-काळ्या रंगाच्या टीयूव्ही गाडीने जालना-गेवराई मार्गे बीडच्या दिशेने येत आहेत. माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ३० ऑक्टोबर रोजी गेवराई बायपासवर सापळा लावला. संशयित गाडी येताच पोलिसांनी ◀◀ पान ३ वर

थकीत वेतनासाठी कामगार गव्हाणीत उड्या मारून आंदोलन करणार!

कडा साखर कारखान्याच्या उद्घाटनाला काळे झेंडे दाखविणार; २८ कोटी ३७ लाखांच्या थकीत देयकाचा प्रश्न पेटला

आष्टी । प्रतिनिधी

कडा येथील महेश सहकारी साखर कारखान्याच्या कामगारांच्या थकीत वेतनाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, तब्बल ५०७ कामगारांनी आता आक्रमक भूमिका घेतली आहे. सप्टेंबर १९९८ ते डिसेंबर २००६ या ९५ महिन्यांच्या कालावधीतील थकीत पगार, ग्रॅच्युइटी आणि निलंबन काळातील वेतन मिळावे, या मागणीसाठी २ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या कारखान्याच्या उद्घाटन कार्यक्रमावर बहिष्कार टाकून काळे झेंडे दाखवत निषेध आंदोलन करण्यात येणार आहे. एवढेच नव्हे तर कारखाना सुरू होताच गेट बंद आंदोलन आणि मागण्यांची दखल न घेतल्यास कारखान्याच्या गव्हाणीमध्ये उड्या मारून आत्मदहन करण्याचा टोकाचा इशारा आष्टी तालुका साखर

२ नोव्हेंबरला उद्घाटन कार्यक्रमावर बहिष्कार; कारखाना सुरू होताच गेट बंद आंदोलनाचा इशारा

कामगार युनियनने दिला आहे.

याबाबत युनियनच्या वतीने तहसीलदार, आष्टी यांना निवेदन देण्यात आले आहे. कामगारांच्या थकीत वेतनासंदर्भात औद्योगिक न्यायालय, कामगार न्यायालय आणि उच्च न्यायालयात न्यायालयीन लढा देण्यात आला. न्यायालयाच्या आदेशानुसार कामगारांना २८ कोटी ३७ लाख ५१ हजार रुपयांहून अधिक रक्कम देय असल्याचा दावा युनियनने केला आहे. १९ ऑक्टोबर २०१९ रोजी यासंदर्भात आदेश देण्यात आला असून, कारखान्याच्या सातबारा उताऱ्यावरही संबंधित रकमेचा बोजा नोंदविण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

९५ महिन्यांचे वेतन अद्याप थकीत

सप्टेंबर १९९८ ते डिसेंबर २००६ या कालावधीतील तब्बल ९५ महिन्यांचे वेतन कामगारांना मिळालेले नाही. याशिवाय ग्रॅच्युइटी आणि निलंबन काळातील पगाराही प्रलंबित असल्याचे युनियनचे म्हणणे आहे. अनेक वर्षे न्यायालयीन लढा देऊनही प्रत्यक्षात कामगारांच्या हातात पैसे पडले नसल्याने कामगारांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी करून थकीत रक्कम तातडीने द्यावी, अशी मागणी युनियनने केली आहे.

कारखाना सुरू होताच गेट बंद आंदोलन

कारखान्याच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या दिवशी कामगार काळे झेंडे दाखवून निषेध नोंदविणार आहेत. त्यानंतर कारखाना प्रत्यक्ष सुरू होताच ५०७ कामगार एकत्र येऊन गेट बंद आंदोलन करणार असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. कामगारांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास गव्हाणीमध्ये उड्या मारून आत्मदहन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या गंभीर इशाऱ्यामुळे प्रशासनासमोर कामगारांच्या प्रश्नावर तातडीने तोडगा काढण्याचे आव्हान उभे राहिले आहे.

शेतकऱ्यांनी ऊस घालू नये, नवीन कामगारांनी कामावर येऊ नये!

आष्टी तालुक्यातील सर्व शेतकरी, कारखान्याचे सभासद आणि नव्याने कामावर रुजू होणाऱ्या कामगारांना युनियनने जाहीर आवाहन केले आहे. कामगारांचे आंदोलन सुरू झाल्यानंतर शेतकऱ्यांनी कारखान्याला ऊस घालू नये, ◀◀ पान ३ वर

कंकालेश्वरची जमीन मोजून देण्यासाठी जिल्हाधिकारी प्रचंड उदासीन – बीड शहर बचाव मंच

बीड । प्रतिनिधी

बीड शहर बचाव मंचाच्यावतीने कंकालेश्वर येथे सुरू असलेल्या विकास कामांचा पाहणी दौरा करण्यात आला. तपशीलवार पद्धतीने पाहणी करत असताना पुरातत्त्व विभाग सहाय्यक संचालक श्रीमती जया वाहणे यांचे काम असमाधानकारक व उदासीन असल्याचे स्पष्ट आढळून आले. विश्वस्त मंडळींना विश्वासात न घेता मनमानीचा कार्यक्रम चालू असल्याचेही दिसून येते. या दौऱ्याच्या वेळी उपस्थित असलेल्या विश्वस्त मंडळानी श्रीमती जया वाहणे यांच्या कामावर प्रचंड नाराजी व्यक्त केली. यानंतर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची प्रत्यक्ष भेट घेऊन कामाच्या ठिकाणी विकास कामाच्या आदेश पत्र तथा अंदाजपत्रकाचे सर्व तपशिलासह फ्लेक्स होर्डिंग तात्काळ लावण्यात यावे अशी आग्रही मागणी करण्यात आलेली आहे. परंतु जॉन्सन यांच्या वतीने कंकालेश्वर मंदिराची जमीन मोजून सर्व हद्दी निश्चित करून देण्याच्या बाबतीत प्रचंड उदासीनता दर्शवण्यात आली. या उदासीनतेचे कारण कळू शकले नाही. या सर्व पार्श्वभूमीवर बीड शहर बचाव मंच व बीड शहरातील जनतेच्या वतीने सद्भावनेने विनंती करण्यात येत आहे की बीड शहराचे आध्यात्मिक वैभव असलेले अद्वितीय कंकालेश्वर महाशिव भोलेनाथ जलमंदिराचा विकास व पुनर्निर्माण सोहळा शास्त्रशुद्ध पद्धतीने, कल्पकतेने, शास्त्रोक्त-मंदिर निर्माण वास्तुविशारद अनुभवी तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली व सहाय्याने भ्रष्टाचार रहित करण्यात यावा. या पाहणी दौऱ्यासाठी श्री. नितिनजी जायभाये, अध्यक्ष: बीड शहर बचाव मंच, कंकालेश्वर देवस्थानचे पुजारी व विश्वस्त संजयजी गुरव, डिजिटल मीडिया पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्ष आरती परळकर, मातृभूमी प्रतिष्ठानचे डॉ. संजय तांदळे, डॉ. यशराज पवळ, सांस्कृतिक विभाग प्रमुख अमोल अंकुरे, सेवानिवृत्त शाम मार्कंडे सर, प्राचार्य कुरे सर, लोकशाही न्यूज चे भागवत वैद्य आदी शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंबाजोगाईत भूमी अभिलेख कार्यालयाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह!

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील जमीन मोजणी प्रकरणावरून भूमी अभिलेख कार्यालयाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आसुन मोजणी अहवालातील कथित विसंगती, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशांची अंमलबजावणी आणि वारंवार पाठपुरावा करूनही न्याय मिळत नसल्याचा आरोप अर्जदार अर्जुन मधुकर काटे यांनी केला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून न्याय न मिळाल्यास २ नोव्हेंबर २०२६ पासून अंबाजोगाई तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

अंबाजोगाई शहरातील सर्व्हे क्रमांक ४६९/१, ४६९/२, ४६९/३, ४६९/४ आणि ४६९/५ या जमिनींच्या मोजणी प्रक्रियेत नियमांचे पालन झाले नसल्याचा आरोप अर्जदाराने केला आहे. मोजणीपूर्वी

जमीन मोजणीतील कथित फेरफारामुळे काटे कुटुंब न्यायाच्या प्रतीक्षेत; अर्जुन काटे यांचा २ नोव्हेंबरपासून आमरण उपोषणाचा इशारा!

नोटीस न देणे, प्रत्यक्ष जागेवरील मोजणीतील कथित त्रुटी आणि मोजणी नकाशातील विसंगती यांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

उपविभागीय अधिकारी, भूमी अभिलेख विभाग आणि अपर जिल्हाधिकारी स्तरावरील कार्यवाहीचा उल्लेख अर्जदाराने निवेदनात केला आहे. मोजणी अहवालातील त्रुटींची पडताळणी आणि दुरुस्तीबाबतच्या आदेशांनंतर नेमकी कोणती कार्यवाही झाली, याबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.

अर्जदाराने आपले वडील मधुकर एकनाथ काटे यांचा १५ मार्च २०२४ रोजी झालेल्या मृत्यूचा उल्लेख निवेदनात केला आसुन जमीन वादातून निर्माण झालेला तणाव आणि त्रास यामुळे वडिलांचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

वास्तविक पूर्वी तलाठी सज्जा अंबाजोगाई यांनी उपअधिक्षक भूमी अभिलेख यांच्या अहवालानुसार क्षेत्र जूळत नाही असा शेरा फेर क. ३७६३९ दि. १०/०१/२०२४ रोजी दिला होता व त्या अहवालात कोणताही बदल झालेला नसताना पूर्वीच्या टिपणी/नोंदी च्या विरूद्ध जावून प्रस्तावित फेरफार नोंदवला आहे. हे कायद्यास धरून नाही. या सर्व प्रकारात कुठेही आम्हाला नोटीस नाही. आम्ही गरीब कुटूंबातून आहोत. रमाकांत थोरात सन २०१२ पासून अंथरूणावर पडून आहेत याचा गैरफायदा दामोधर हरिभाउ थोरात हे घेवून सर्व ◀◀ पान ३ वर

दुष्काळी परिस्थितीमुळे मजूर कुटुंबांवर उपासमारीचे संकट; उप विभागीय अधिकारी यांना दिले निवेदन

पाटोदा । प्रतिनिधी

पावसाने ओढ दिल्याने पाटोदा तालुक्यातील शेती व्यवसाय अडचणीत आला असून, शेतातील पिके अपेक्षेप्रमाणे न आल्याने ग्रामीण भागातील मजुरांच्या हाताला काम मिळणे कठीण झाले आहे. शेतीतील मजुरीची कामे ठप्प झाल्याने रोजंदारीवर उदरनिर्वाह करणाऱ्या मजूर कुटुंबांसमोर आता कुटुंबाचा गाडा चालवायचा कसा, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर पाटोदा परिसरात रोजगार हमी योजनेची कामे तातडीने सुरू करून मजुरांना काम उपलब्ध करून द्यावे, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात मजूर महिलांच्या उपस्थितीत पाटोदा



पाटोद्यात मजुरांच्या हाताला काम नाही; रोजगार हमीची कामे तातडीने सुरू करा!

उप विभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या वेळी उप विभागीय अधिकारी कार्यालयाचे श्री.बाबर साहेब यांनी निवेदन स्वीकारले. तर माहितीस्तव तहसील कार्यालय पाटोदा तसेच मुख्याधिकारी, नगर पंचायत पाटोदा यांना निवेदन सादर करण्यात आले. नगर पंचायत कार्यालयात नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव व नगर पंचायतचे अधिकारी श्री.मस्के साहेब यांनी तर तहसील कार्यालयात तहसील कार्यालयाचे श्री.मुळे साहेब यांनी मागणीचे निवेदन स्वीकारले. पाटोदा तालुक्यात पावसाच्या अनियमिततेमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले असून, अनेक शेतकऱ्यांच्या शेतात अपेक्षित उत्पादन आलेले नाही. परिणामी शेतीवर अवलंबून असलेल्या शेतमजुरांच्या रोजगाराचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. हाताला काम नसल्याने रोजच्या उत्पन्नावर जगणाऱ्या कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटली असून, मजुरांवर आर्थिक संकट ओढवले आहे.

बीड-कोळवाडी घाटात एकाच दिवशी सलग पाच अपघात; दोघांचा मृत्यू

अनेक वाहनांचा चकनाचूर, वाहतूक कोंडीने प्रवासी त्रस्त

बीड । प्रतिनिधी

बीड-कोळवाडी घाटात आज सकाळपासून अपघातांची मालिका सुरूच राहिली असून सलग पाच भीषण अपघात घडले. या दुर्दैवी घटनांमध्ये दोन निष्पाप व्यक्तींना आपला जीव गमवावा लागला आहे. ट्रक, टेम्पो आणि दुचाकी अशा वाहनांची एकमेकांना जोरदार धडक बसल्याने घाटात प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करत एकेरी मार्गाने वाहतूक पूर्ववत सुरू केली आहे.

पवनचक्कीचा ट्रक ठरला अपघाताचे कारण

घाटातील तीव्र चढणीच्या वळणावर पवनचक्कीचे साहित्य घेऊन जाणारा एक भलामोठा अवजड ट्रक रस्त्यावरच उभा राहिला होता. घाटातून वर चढणाऱ्या आणि उतारावरून खाली येणाऱ्या वाहनांचा वेग जास्त असल्याने चालकांना उभ्या ट्रकचा अंदाज आला नाही. परिणामी, एकापाठोपाठ एक अशा पाच वाहनांची धडक झाली. यात दुचाकी आणि टेम्पोचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला असून जखमींना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



प्रचंड वाहतूक कोंडी; तासांनंतर एकेरी मार्ग सुरू

अपघातांचे वृत्त समजताच पोलिसांनी ◀◀ पान ३ वर

ग्राममहसूल अधिकाऱ्याला मारहाण करून डोके फोडल्याप्रकरणी; ज्ञानेश्वर कांदे यांच्यावर गुन्हा दाखल

घाटनांदुर । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील वाकडी येथे शासकीय कामकाजासाठी गेलेल्या ग्राममहसूल अधिकारी (तलाठ्याला) शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास वाकडी ग्रामपंचायत कार्यालय येथे घडली. या प्रकरणी ज्ञानेश्वर मुकुंदराव कांदे (रा. वाकडी) यांच्याविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तक्रारदार पट्टीवडगाव सज्जाचे तलाठी राजपाल खंडू बैकरे(वय ५०) हे अंबाजोगाई महसूल विभागात कार्यरत असून, वाकडी येथील साठवण तलावात पाणी चोरी



रोखण्यासाठी शासकीय कामानिमित्त गेले होते. यावेळी ज्ञानेश्वर मुकुंदराव कांदे यांनी वाकडी तलावातील मोटारचा स्टार्टर काढून आणून जमा केल्याच्या कारणावरून त्यांच्याशी वाद करून शिवीगाळ करून धक्काबुक्की व मारहाण केली.दरम्यान, ग्रामपंचायत कार्यालयाच्या आवारात पडलेली वीट उचलून ग्राम महसूल अधिकारी बैकरे यांच्या डोक्यात मारल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. तसेच डाव्या पायाच्या मांडीला चावा घेऊन दुखापत केल्याने तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.या घटनेप्रकरणी ग्राममहसूल अधिकारी बैकरे यांनी पोलिसांत धाव घेतल्यानंतर ज्ञानेश्वर मुकुंदराव कांदे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता बी एन एस २०२३ नुसार१०९(१), १३२,१२१(१), ११५(१), ११८(१),३५२ गुन्हा बर्दापूर पोलीस स्टेशन येथे नोंदविण्यात आला आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सतीशकुमार सारुळे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26